www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी




मुख्य संपादक - भारती संतोष आमले  उपसंपादक - श्री विलास मनोहर गायकवाड  कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे  निवासी संपादक- श्री राकेश जनार्दन पाटील  सह संपादक - मुकुंद कांबळे

वर्ष : २  अंक : 314  सोमवार दि. 28 जुलै २०२५  किंमत : ४ रु  पृष्ठ : ४  RNI MAHMAR/2023/89514

# परशुराम घाटात दरडीकडील भाग धोकादायक

## महामार्गावर एकेरी वाहतूक, दुरुस्तीच्या कामाला ब्रेक

दैनिक युवक आधार
योगेश सुतार चिपळूण (प्रतिनिधी)

गेल्या तीन दिवसांपासून येथे पावसाचा पुन्हा जोर वाढल्याने मुंबई गोवा महामार्गावरील परशुराम घाटात धोका आणखी वाढला आहे. यावर ताप्तुरती उपाययोजना म्हणून दरडीकडील मार्ग पुर्णपणे बंद करून दुसऱ्या बाजूने एकेरी वाहतूक सुरू ठेवली आहे. त्याशिवाय गॅबीयन वॉलचा भराव वाहून जात असल्याने तेथे प्लास्टीकचे अच्छादन केले आहे. परंतू वाढत्या पावसामुळे दुरूस्तीच्या उपाययोजना करण्यात अडथळा निर्माण झाला असून पावसाचा जोर कमी होताच दुरूस्तीला चालना मिळणार आहे.

परशुराम घाटातील चौपदरकीरण या ना त्या कारणाने नेहमीच चर्चेत राहिले आहे. सुरवातीला कुळ, खोत व देवस्थानच्या मोबदल्यावरून परशुराम नेहमी चर्चेत राहिला. त्यानंतर परशुराम घाटाच्या डोंगर माथ्यावर व पायथ्याशी असलेल्या वस्तीचा सुरक्षिततेचा मुद्दा उपस्थित झाला. परंतू आता हे सर्व बाजूला राहिले असून परशुराम घाटातील धोकादायक स्थितीत असलेला रस्ता दुरूस्तीचे काम राष्ट्रीय महामार्ग विभागाने हाती घेतला आहे.



पावसाळ्यापुर्वी घाटातील अतिशय धोकादायक असलेल्या ठिकाणी कॉंक्रिटीकरणाला जागोजागी तडे गेले होते. तसेच काही ठिकाणी रस्ताही खचला होता. त्यावर उपाययोजना करण्याच्या दृष्टीने ठेकेदार कंपनी व राष्ट्रीय महामार्ग विभागाकडून प्रयत्न सुरू असतानाच काही महिंन्यापुर्वी अचानक रस्त्याचा मोठा भाग खचला आणि त्या ठिकाणची सरंक्षक भिंतही कोसळली. तेव्हापासून आजतागायत परशुराम घाटात एकेरी वाहतूक केली जात आहे. खचलेल्या रस्त्याच्या ठिकाणी गॅबीयन वॉल उभारली जात होती. तसेच पायथ्यालगत डबर व सिमेंटच्या आधारे मजबूतीकरण केले जात होते.

हे काम सुरू असताना मे महिन्यात झालेल्या पहिल्याच पावसात नव्याने उभारलेली गॅबीयन वॉल खचली. त्यानंतर काही दिवसातच या गॅबीयन वॉलचा काही भाग भरावासह वाहून गेल्याने या मार्गावरील धोका आणखी वाढला. परशुराम घाटात आतापर्यंत अनेकदा दरडी कोसळण्याच्या घटना घडल्या आहेत. त्यानंतर अधूनमधून भराव वाहून जाणे, सरंक्षक भित व कॉंक्रिटीकरणाला तडे जाणे, दरडीची माती घसरणे, रस्त्यावर दगड येण्याचे प्रकार सुरूच आहेत. त्यासाठी डोंगरावर लोखंडी जाळी बसवण्याचे काम भर पावसातही सुरूच आहे.

परंतू या घाटातील दरडीकडील मार्ग अतिशय धोकादायक बनल्याने याठिकाणी बॅरिकेटस उभारून एकेरी वाहतूक सुरू ठेवली आहे. त्यामुळे काही वेळा याठिकाणी वाहतूक कोंडीचे प्रकारही घडत आहेत. विशेषतः अवजड वाहतूकीमुळे वाहतूक कोंडीत जास्त भर पडत आहे. अतिवृष्टीच्यावेळी अवजड वाहतूक सकाळ व संध्याकाळच्या सत्रात बंद ठेवावी अशी मागणी होत आहे.

> परशुराम घाटात पावसामुळे गॅबीयन वॉलच्या दुरूस्तीच्या कामात अडथळा येत आहे. पावसाचा जोर कमी झाल्यानंतरच या कामाला चालना मिळेल. घाटातील पाण्याचा व्यवस्थीत निचरा होण्यासाठी नियोजनबद्ध प्रयत्न केले जात आहेत. स्टेपिंग पद्धतीने पाण्याचा निचरा झाल्यानंतर भराव, अथवा दरडी घसरण्याचे प्रकार घडणार नाहीत.
> पंकज गोसावी, शाखा अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग

# देउरवाडी येथील पुरातनकालीन निसर्ग रम्य परिसरात वसलेले महादेव मंदिर

### खोरीतला महादेव म्हणून प्रसिद्ध

## आज श्रावण महिन्याच्या पहिला सोमवार


**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी : देवा पवार**

आर्णी : संपूर्ण देशात श्रावण मास पाळला जातो. या महिन्यात नागपंचमी, रक्षाबंधन, पोळा असे सन सुद्धा येतात,

देउरवाडी येथील मंदिराचे वैशिष्ट्य म्हणजे अनेक वर्षापूर्वी पासून हे मंदिर अस्तित्वात आहे.

इथे मंदिराचे अवतीभोवती सुंदर असे घनदाट डोंगर, दरी, आणि त्यात वसलेले हे मंदिर.

म्हणतात की महादेवाला निसर्ग रम्य परिसरात व शांत वातावरणात ध्यान करायला आवडत होते, म्हणून अनेक ठिकाणी महादेवाचे मंदिर हे गावाच्या बाहेर असतात.



हे मंदिर महादेव खोरी म्हणून प्रसिद्ध आहे, कारण हे मंदिर गावाच्या बाहेर व डोंगरात दरीच्या काठी असल्याने ते खोरी या नावाने ओळखले जाते.

येथे फक्त श्रावण च नाही तर संपूर्ण वर्ष सोमवार या दिवशी भक्तगणाची प्रचंड गर्दी पाहायला मिळते.

आणि सोमवार या दिनी भाविक गण जेवण सुद्धा देत असतात,

आश्चर्य जनक बाब म्हणजे येथील डोंगरावर सुद्धा साधूबाबांची एक प्रेक्षणीय अशी (कुटी) झोपडी आभारून आहे, पर्यटक तिथे सुद्धा गर्दी करतात.

प्रसिद्ध झाल्यामुळे या देणगी, राजकीय नेत्यांची भेट, दर्शन करिता दौरे, आणि मंदिराकरिता मदत मिळतात,

श्रावण महिन्यात उपवास करणाऱ्या भक्तांसाठी काही जण उपहार वाटप करतात,

प्रातः काळ येऊन मंदिराची स्वच्छःता करत पूजा आरती करण्यात येते.

विशेष म्हणजे श्रावण महिन्यात या ठिकाणी येणाऱ्या भाविकांमध्ये उत्साह संचारतो.

# करंजातील तुळजाई मासेमारी बोटीला जलसमाधी

## पाच खलाशी सुखरूप तीन खलाशी बेपत्ता.







दैनिक युवक आधार
महाराष्ट्र प्रतिनिधी

उरण करंजा येथील मनोहर गणपत कोळी यांच्या मालकीच्या तुळजाई नावाच्या मासेमारी करणाऱ्या बोटीला खांदेरी किल्ल्यानजीकच्या समुद्रात कलंडून जलसमाधी मिळाली. यामासेमारी नौकेतीत आठ खलाशी होते त्यापैकी पाच जण सुखरूप असून तीन जण बेपत्ता असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे. करंजा येथून तुळजाई मासेमारी नौका सकाळी मासेमारीसाठी निघाली होती. हवामान खात्याने सागरी किनारपट्टीवर वादळी वाऱ्यासह पावसाचा अंदाज वर्तवला होता. त्याचबरोबर जिल्हा प्रशासनाने मच्छीमार बांधवांना खोल समुद्रात मासेमारीला जाण्याबाबत सावधगिरीचा इशारा दिला होता. तरी देखील भर पावसात लाटांचा मारा सहन करीत कारंजा येथील मनोहर कोळी यांची तुळजाई नावाची नौका मासेमारीसाठी समुद्रात झेपावली होती. शनिवारी सकाळी सोसाट्याचा वारा आणि मुसळधार पावसासह लाटांचा माऱ्या बरोबर झुंज देत ही नौका मार्ग आक्रमत होती परंतु निसर्गाचा प्रकोप नौकेला सहन झाला नाही. यामुळे तुळजाई मासेमारी नौका खांदेरी किल्ला परिसरातील समुद्रात कलंडली. आणि या नौकेलाअखेर जलसमाधी मिळाली. या नौके मध्येमुख्य नाखवासह सात जण असे एकूण आठ जण होते.नौका बुडणार असल्याचे लक्षात येताच नौकेवरील आठही खलाश्यांनी जणांनी खवळलेल्या समुद्रात उउड्या घेतल्या. आठ जणांपैकी पाच जण सुमारे 8 ते 9तास खवळलेल्या समुद्रातील पाण्याबरोबर झुंज देत पोहत बाहेर आले, दरम्यान ते किरकोळ जखमी झाले आहेत. त्यांना जिल्हा सामान्य रुग्णालय अलिबाग येथे उपचाराकरिता दाखल करण्यात आलेले आहे. करंजातील तुळजाई मासेमारी नौकेला जलसमाधी मिळाली असली तरी त्यांतील पाच खलाशी सुखरूप असून तीन खलाशी बेपत्ता आहेत शासनाने 31 जुलै पर्यंत मासेमारी साठीखोल समुद्रात मासेमारी करण्या साठी पूर्णपणे बंदी असल्याचे जाहीर करूनही केवळ पैश्याच्या लोभा पाई मासेमारी करणाऱ्या नौकांचे मालक हे मत्स्य विभागांतील अधिकाऱ्यां बरोबर अर्थपूर्ण मैत्रीचे संबध राखीत मासेमारी करण्या साठी आपल्या मासेमारीनौका वादळीवाऱ्यासह खवळलेल्या समुद्रात हाकारतात आणि स्वतःच्या स्वार्थासाठी नौकेवर करणाऱ्या ख्लाश्यांच्या जीवाची बाजी लावतात व त्यांचा परिवार वाऱ्यावर सोडून देतात. दरम्यानहाती आलेल्या वृतानुसार राज्यातील व करंजा गावातील नामांकित व्य

# कोकण रत्न पदवीसाठी नामांकन पाठविण्याचे आवाहन....

**दैनिक युवक आधार**
**मुंबईः- (प्रमोद तरळ)**

स्वतंत्र कोकण राज्य अभियान अंतर्गत विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या १० महिला आणि कोकणी बांधवांना शनिवार १३ डिसेंबर २०२५ रोजी मुंबई मराठी पत्रकार संघ, दुसरा मजला, महापालिका मार्ग, आझाद मैदान शेजारी मुंबई येथे होणाऱ्या कार्यक्रमात कोकण रत्न पदवी प्रदान करण्यात येणार आहे. या मध्ये पदवीप्राप्तांना सेमी पैठणी साडी, गोल्ड प्लेटेड मेडल, आकर्षक फ्रेममध्ये कोकण रत्न पदवी प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल

कोकण रत्न पदवीसाठी कुठल्याही प्रकारची फी आकारली जात नाही कोकण रत्न पदवीसाठी संजय कोकरे संस्थापक/अध्यक्ष ९२२४४४३११९, धनंजय कुवेसकर - ९८६९०७६६०२, सुखदेव पवार - संघटक ८०८२७६९०९१ यांच्या व्हाट्सअप वर आपले नामांकन पाठवावे असे आवाहन स्वतंत्र कोकण राज्य अभियानाचे संस्थापक/अध्यक्ष संजय कोकरे यांनी केले आहे.

स्वतंत्र कोकण राज्य अभियान
कोकण सर्वोतोपरी
"कोकणी माणसा जागा हो"



## बी इन ग्रुप फाउंडेशनतर्फे कोल्हेगावात आदिवासी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व खाऊ वाटप

**दैनिक युवक आधार**
**किशोर गुडेकर, मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख**

मुरबाड (ठाणे) | कोल्हे गाव येथील जिल्हा परिषद शाळेत बी इन ग्रुप फाउंडेशनच्या वतीने आदिवासी मुलांना शालेय साहित्य व खाऊचे वाटप करण्यात आले. या उपक्रमात शालेय विद्यार्थ्यांसोबतच महिला वर्गानेही मोठ्या संख्येने सहभाग घेतला. या प्रसंगी प्रमुख पाहुण्या म्हणून भारतीताई जैन, फाउंडेशनच्या संचालिका रोहिणी जाधव, श्रद्धा गायकवाड, जगदीश गायकवाड, उमेश गायकवाड, गणेश भालेराव, सोमनाथ राऊत, प्रतिभा सोनोने आणि प्राप्ती कदम उपस्थित होते.

बी इन ग्रुप फाउंडेशन गेली अनेक वर्षे सामाजिक कार्यात सक्रीय असून आदिवासी व गरजू भागांमध्ये जाऊन शालेय साहित्य, अन्नधान्य, औषध वाटप, प्रशिक्षण शिबिरे, मेडिकल कॅम्प, वस्त्रवाटप अशा उपक्रमांचे सातत्याने आयोजन करत असते.

संस्थेच्या माध्यमातून रस्त्यावरच्या भटक्या कुत्र्यांचा आणि गोमातांचा देखील उपचार व देखभाल केली जाते. अनाथ आश्रम, दिव्यांग वसतीगृह, वृद्धाश्रम आणि वंचित वस्त्यांमध्ये गरजूंना जीवनोपयोगी मदत पोहोचविण्याचे कार्य फाउंडेशन करत आहे.

अशा उपक्रमांना सर्वसामान्य जनतेच्या सहकार्याची नितांत आवश्यकता आहे. इच्छुकांनी 9967296119 या क्रमांकावर संपर्क साधावा.








## लोअर परळ वरळी सामाजिक विकास संस्थेच्या कडून ज्येष्ठ नागरिक, योग गुरु -शिष्य व शालेय विद्यार्थ्यांचा सन्मान संपन्न

**दैनिक युवक आधार**
**लोअर परेल/ आण्णासाहेब आहेर**

माध्यमातूनलोअर परळ वरळी सामाजिक विकास संस्थेच्या आयोजनात कै. वसंत पाटकर व कै.संतोष पाटकर यांच्या स्मरणार्थ जेष्ठ नागरिकांचा सन्मान, योग गुरु-शिष्य सन्मान व शालेय गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान शनिवार दिनांक २६,जुलै रोजी विश्वकमल सोसायटी लोअर परेल येथे आमदार महेश सावंत व आमदार सुरेश शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत सन्मान सोहळा जुन्या आठवणींना उजाळा देत आनंदमय वातावरणात संपन्न झाला कै.वसंत देऊ पाटकर व




कै.संतोष वसंत पाटकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करत भाव गीतातून उपस्थितांना आनंद देत कार्यक्रमाची सुंदर सुरुवात झाली आमदार महेश सावंत यांनी जुन्या आठवणींना उजाळा देत सांगताना गरिबीतून वाटचाल व जिद्दीतून काम करत राहिलो समाजकारण करता करता राजकारणात उद्धव ठाकरे साहेबांनी सामान्य माणसाला असामान्य केले असे मत व्यक्त केले. समाजामुळेच आम्ही आमदार झालो असून तुम्ही मानसन्मान दिला म्हणून केवळ खुर्चीवरच बसून राहायचे नाही ईश्वराने सुबुद्धी देवो व काम करण्याची ताकद द्यावी समाजाची सेवा आम्ही करत राहू असे मत आमदार सुनील शिंदे यांनी व्यक्त केले महेश सावंत व सुनील शिंदे दोन्हीही आमदारांनी समाजसेवक प्रकाश पाटकर यांचे सामाजिक कार्य अनेक वर्षानुवर्ष आम्ही पाहत आलो असून प्रकाश पाटकर यांच्या समाजकार्याला आमदारांनी शुभेच्छा दिल्या व शारदा कॉम्प्युटरचे मालक गणेश परब यांनी गुणवंत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत भविष्यात यशस्वी वाटचालीसाठी महत्वपूर्ण मार्गदर्शन केले,१०७ वेळा रक्तदान करणाऱ्या विलास खाडेगावकर यांचा सन्मान करण्यात आला त्यांनी रक्तदानाचे महत्त्व उपस्थित जनतेला पटवून दिले,योग गुरुं-शिष्यांचाही सन्मान झाल्यानंतर योग गुरुंनी सध्याच्या जीवनशैलीमध्ये योगाचे महत्त्व पटवून दिले

सन्मान सोहळा संपन्न होत असताना प्रकाश पाटकर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना राजकीय पदाची अपेक्षा न करता निवडणूक लढवण्याबाबत चाहत्यांच्या प्रश्नाला उत्तर देताना निवडणूक लढवण्याऐवजी भावी आयुष्यामध्ये ज्येष्ठांची सेवा करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला व त्या अनुषंगाने काम चालू असल्याचेही त्यांनी मनोगतात आपली भावना व्यक्त केली.

समाजसेवक प्रकाश पाटकर यांनी जीवन प्रवासात अनेक चांगल्या माणसांशी संबंध जोपासत जनसंपर्कातून अनेक व्यक्तिमत्त्वांशी मैत्री जपली असून ज्या ज्या वेळी ते विविध समाज कार्य हाती घेतात त्यावेळेस अनेक देणगी रुपी हात पुढे येतात व गरजवंतांना योग्य प्रकारे मदत पोहोचवण्याचं काम ते करत असतात बंधू कै.संतोष पाटकर यांच्या वर्षश्राद्ध दिनी विविध सामाजिक उपक्रम राबवणार असल्याचे समाजसेवक प्रकाश पाटकर यांनी सांगत उपस्थित सर्व मान्यवरांचे व जनतेचे आभार मानले,जगन्नाथ कामत यांनी आपल्या हॉटेल मधील प्रसिद्ध वडे सर्वांना खाऊ घालत आनंदी वातावरणात सन्मान सोहळा संपन्न झाला

## मानसिक आरोग्य आणि जनजागृती

" आरोग्यम् धनसंपदा" म्हण आपण ऐकलेली आहे. परंतु शरीरासोबत मानसिक आरोग्य ही तितकेच महत्त्वाचे आहे. आजच्या धावपळीच्या आणि तणावपूर्ण जीवनशैलीत मानसिक आरोग्याच्या समस्यामध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ होत आहे. यासाठी जनजागृती आवश्यक आहे.

मानसिक आरोग्य म्हणजे आपले विचार भावना आणि वागणं समजून घेण्याची तयारी आणि त्यावर योग्य नियंत्रण ठेवण्याची क्षमता. अगदी सोप्या भाषेत सांगायचे झालं तर आनंदी आणि शांत राहण्याची मनस्थिती. मानसिक आरोग्य चांगले असेल तर तनाव, अपयश, दुःख यांना सकारात्मक दृष्टिकोनातून पाहता येते. इतरांशी आपले संबंध चांगले ठेवता येतात. आपले विचार मनमोकळेपणाने मांडता येतात. मानसिक आरोग्य चांगले असेल तर निर्णयक्षमता ही चांगली असते.

तणाव, चिंता आणि दुःख हे जीवनाचे कटू सत्य आहे. प्रत्येक माणसाला आयुष्यात कधी न कधीतरी अडचणी,अपयश, दुःख हे येतेच. अशा परिस्थितीत खचून न जाता, स्वतःला सावरून पुढे जाणे हेच खरी मानसिक शक्ती. " कधीकधी ढगांनी आकाश झाकलं जातं पण सूर्यास्त होत नाही "असा विचार करून परत नव्याने सुरुवात केली पाहिजे.

सकारात्मक विचार केला पाहिजे. अडचणींमध्ये सुद्धा संधी शोधली पाहिजे. आपली चूक झाली तर ती मान्य करता आली पाहिजे. आणि सर्वात महत्त्वाचा स्वतःवरती विश्वास असला पाहिजे . सकारात्मक विचारांनी आत्मविश्वास वाढतो. मन प्रसन्न आणि शांत राहतं. निर्णय घेण्याची क्षमता वाढते.



मानसिक आरोग्य चांगले राखण्यासाठी संवाद करणे गरजेचे आहे. आपले विचार, भावना आणि गरजा योग्य पद्धतीने दुसऱ्या पर्यंत पोहोचवता आले पाहिजे. समोरच्याचं ऐकून, समजून घेणं आणि योग्य शब्दात उत्तर देणं तितकच महत्वाचा आहे. चांगला संवाद साधण्यासाठी समोरच्याचं ऐकायला हवं. रागावून न बोलता शांतपणे प्रतिक्रिया द्यायला हवी. सवादामुळे मतभेद टाळता येतात. आत्मविश्वास वाढतो आणि नातेसंबंध सुधारतात.

रोज योग , ध्यान केल्यानेही मानसिक आरोग्य चांगले राहते. नियमित व्यायाम केल्याने तणाव कमी होतो. एखादा छंद जोपासावा, छंदामुळे आपले मन प्रसन्न राहते. मानसिक आरोग्य चांगले ठेवण्यासाठी, शक्य तितकी सोशल मीडियापासून दूर राहायला हवे. मन निरोगी असेल तर शरीरही साथ देतं. म्हणून मानसिक आरोग्याची काळजी घेणे प्रत्येकाच्या आयुष्यासाठी आवश्यक आहे.

मानसिक आरोग्यासाठी जनजागृती महत्त्वाची आहे कारण, समाजात अजूनही गैरसमज आहेत की मानसिक त्रास झालेला व्यक्ती वेडा आहे . त्यामुळे लोक भीतीपोटी उपचार घेत नाहीत. तसेच चिंता, नैराश्य,तणाव हे आजार आहेत हे लोकांना माहीतच नाही. लोक काय म्हणतील या भीतीपोटी उपचार घेणे टाळले जाते. परस्परांमधील स्पर्धा, अपयश, सोशल मीडिया यामुळे मुलांमध्ये मानसिक तणाव वाढत आहे. म्हणूनच शाळा, गाव,सोशल मीडिया अशा सर्व ठिकाणी यावर बोललं गेलं पाहिजे.

शेवटी एवढेच सांगावसं वाटतं आता गरज आहे
मनापासून बोलण्याची....
मनापासून ऐकण्याची....
आणि एकमेकांना समजून घेण्याची.....

लेखन
( नम्रता स्वरूप घोडके )



**दैनिक युवक आधार -** पाटोदा येथील पत्रकार महेश बेदरे यांनी एल.एल.बी.कायद्याची पदवी यशस्वीरित्या उत्तीर्ण झाल्याबद्दल त्यांचा पाटोदा नगर पंचायत कार्यालयात सत्कार करण्यात आला. या प्रसंगी नगराध्यक्ष राजूभैय्या जाधव, उपनगराध्यक्ष रोहिदास गिते, आमदार सुरेश आण्णा धस यांचे स्वीय सहाय्यक तथा पाटोदा तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष सोमीनाथ कोल्हे, माजी उपनगराध्यक्ष नय्युम भाई पठाण, सभापती रामेश्वर गोरे, माजी मुख्याध्यापक एल.आर.जाधव सर, दादासाहेब घुमरे सर, सभापती सुनिल वाघमारे, डॉ.चौरे साहेब, डॉ.विधाते साहेब, जितेंद्र भोसले यांच्या सह अधिकारी, पदाधिकारी उपस्थित होते.

(छाया - शेख महेशर ताहेर पाटोदा.)

## रिठद येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेमध्ये शिवसेना पक्षप्रमुखाचा वाढदिवस साजरा.

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार पाटील**

रिसोड तालुक्यातील रिठद येथील जिल्हा परिषद केंद्रीय वरिष्ठ प्राथमिक शाळा क्रमांक एक येथील शाळेत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त वरिष्ठ नेत्यांच्या आदेशाने व रिसोड विधानसभेचे सहसंपर्कप्रमुख विश्वनाथ सानप, उपजिल्हाप्रमुख डॉ.चंद्रशेखर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली रिसोड तालुक्यात शिवसेनेचे रिसोड तालुकाप्रमुख नारायणराव आरु यांनी आपल्या पक्षाचे पदाधिकारी व शिवसैनिक व शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सदस्य यांच्या उपस्थितीत शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. यामध्ये वही,पेन व खाऊचे वाटप करण्यात



आले.यावेळी विद्यार्थी यांना पक्षप्रमुख यांच्या वाढदिवसानिमित्त मार्गदर्शन करतांना शिवसेना तालुकाप्रमुख नारायण आरु यांनी बोलतांना सांगितले की शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे हे शिवसेना पक्षाचे पक्षप्रमुख तर आहेतच पण एक माजी मुख्यमंत्री तर होते. परंतु आपल्या महाराष्ट्राला कुटुंब म्हणून सांभाळले.आणी या महाराष्ट्रातील प्रत्येक व्यक्ती माझ्याच कुटुंबातील सदस्य आहे.याचेच भान7 ठेवून प्रत्येक नागरिकाला कोरोना काळात दिलासा देण्याचे काम केले. शेतकऱ्याविषयी धोरण राबतांना जगाच्या पोशिंद्याला सरकार येताच कर्जामाफी साठी कोणत्याही शर्थि अटी न ठेवता आणखी शेतकऱ्याला कोणताही त्रास न देता केवळ अंगठा टेकवला की कर्जमाफी झाली. असे शब्द सेतू चालवण्याऱ्या व्यक्तीच्या तोंडातून पडताच शेतकऱ्यांच्या तोंडावर हसू फुलायचे असे पक्षप्रमुख शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त या शाळेतील सामान्य कुटुंबातील विद्यार्थी शिकत आहेत त्यांना काहीतरी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या पक्षाच्या पक्षप्रमुखाच्या वाढदिवसानिमित्त शिवसेनेचे तालुकाप्रमुख नारायणराव आरू यांनी शालेय साहित्य वाटप केले. यावेळी शिवसेना रिठदचे शाखाप्रमुख गंगाधर आरु, जेष्ठ शिवसैनिक लक्ष्मण ठोकळ, गटप्रमुख आत्माराम किसन बोरकर , शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विजय अशोक बोरकर, माजी अध्यक्ष गजानन अशोक बोरकर, गणेश भगवान आरु,राजु पांडुरंग आरु, वैभव रामदास आरु, इत्यादी कार्यकर्ते व सहकारी उपस्थित होते.तर या शाळेचे मुख्याध्यापक मनोज इंगळे, गजानन साबळे(शिक्षक ),सौ. आशा बोरकर (शिक्षक )मदन आरू (शिक्षक ),बाळकृष्ण बोरकर(शिक्षक )ज्ञानेश्वर अजय प्रभाकर आरु(शिक्षण सेवक) उपस्थित होते.या कार्यक्रमाचे शेवटी विद्यार्थी यांना खाऊ वाटप केला. व कार्यक्रमाचे संचलन मदन राघोजी आरु यांनी केले तर आभार प्रदर्शन ज्ञानेश्वर महादू आरु यांनी केले.

## “समाजासाठी काही तरी करावं हीच प्रेरणा” रावसाहेब खाकाळ यांची खास मुलाखत

प्रश्नः आपला जन्म, बालपण आणि शिक्षणाबाबत थोडक्यात सांगा.

उत्तरः माझा जन्म 28/5/1969 रोजी अंभोरा गावात झाला. आई शांताबाई आणि वडील कै. त्र्यंबक खाकाळ हे शिक्षक होते. प्राथमिक शिक्षण अंभोरा येथे झाले आणि पाचवी ते दहावी चिचोंडी पाटील येथे. अकरावीपर्यंत नगर कॉलेज, अहमदनगर येथे शिक्षण घेतले. त्यानंतर आय.टी.आय अहमदनगर येथे औद्योगिक शिक्षण पूर्ण केलं.

प्रश्नः शिक्षणानंतर तुम्ही कोणत्या क्षेत्रात प्रवेश केला?

उत्तरः शिक्षणानंतर बजाज ऑटो, औरंगाबाद येथे नोकरी केली. मात्र नोकरीत फार मन रमले नाही. माझा कल नेहमीच व्यवसायाकडे होता.

प्रश्नः व्यवसायाची सुरुवात कशी केली?

उत्तरः गावाकडे आल्यानंतर सुरुवातीला काही दिवस टेम्पो चालवण्याचं काम केले. त्यानंतर डेअरी व्यवसाय सुरू केला. नंतर पेप्सी एजन्सी, , दुधाचा चीलिंग प्लांट

पशुखाद्य आणि कापड दुकान सुरू केलं. अनेक व्यवसाय हाताळले आणि



त्यातून अनुभव घेतला.

प्रश्नः सध्या कोणत्या व्यवसायात सक्रिय आहात?

उत्तरः गेल्या 15 वर्षांपासून अहमदनगर येथे कांदा व्यापारी म्हणून कार्यरत आहे. शेतकरी आणि व्यापाऱ्यांमध्ये समन्वय साधत हा व्यवसाय करत आहे.

प्रश्नः पतसंस्थेच्या स्थापनेबाबत काय सांगाल?

उत्तरः 2003 साली अंबेश्वर पतसंस्थेची स्थापना केली. चेअरमन म्हणून जबाबदारी घेतली. संस्थेमार्फत अनेक लोकांना आर्थिक मदत देता आली, याचा आनंद आहे.

प्रश्नः राजकीय प्रवासाची सुरुवात कशी झाली?

उत्तरः २००० ते २००५ या काळात अंभोरा गावाचे उपसरपंच म्हणून काम केलं. त्या काळात गावाच्या विकासासाठी अनेक उपक्रम राबवले. त्या काळात स्वजलधारा ही योजना राबवली. गावामध्ये सिमेंट रस्ते केले.

प्रश्नः सामाजिक कार्यात आपला सहभाग नेहमी दिसतो. त्याबद्दल थोडं सांगा.

उत्तरः अंबेश्वर मंदिरातील पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, नंदीच्या मूर्तीवर छत बसवणे, सभामंडपासाठी रोख देणगी अशी कामं केली. शाळेसाठी आर्थिक मदत करतो.

प्रश्नः विद्यार्थ्यांसाठी आपण काही विशेष उपक्रम राबवता, त्याबद्दल सांगा.

उत्तरः गावातील गोरगरीब विद्यार्थ्यांचे शैक्षणिक पालकत्व घेतलं आहे. पहिली ते दहावीपर्यंतच्या गरजू विद्यार्थ्यांचा वर्षभराचा खर्च मी उचलतो. त्यांना वही, व वर्षभर लागणारे शैक्षणिक साहित्य, फी यासाठी मदत करतो.

प्रश्नः भविष्यातील योजनांबद्दल काय सांगाल?

उत्तरः समाजसेवा आणि शिक्षण क्षेत्रात अधिक योगदान द्यायचं आहे. नव्या पिढीला प्रेरणा मिळावी अशी कामं करायची आहेत.

प्रश्नः शेवटी, तरुणांसाठी एखादा संदेश?

उत्तरः मेहनत, प्रामाणिकपणा आणि समाजासाठी काहीतरी करण्याची भावना ठेवली, तर यश हमखास मिळतं. स्वतःसाठी नाही, तर इतरांसाठी जगा, हेच सांगतो.

खरोखर आजच्या तरुणांना आदर्श घ्यावं असं हे व्यक्तिमत्व आहे. आजचा तरुण परिस्थिती हाताशी रोजगार नसल्यामुळे निराश झालेला दिसून येतो मात्र रावसाहेब खाकाळ यांच्या कार्याकडे पाहिले तर जिद्द आणि चिकाटी असेल तर माणूस जीवनामध्ये नक्कीच यशस्वी बनू शकतो ही प्रेरणा त्यांच्या या मुलाखतीतून आजच्या तरुणांनी नक्कीच घेणे योग्य आहे. आजच्या तरुणांसाठी प्रेरणादायी असणारं हे व्यक्तिमत्त्व आहे.

**मुलाखतकार**
**-पत्रकार बाळासाहेब रकटाटे**

## स्वच्छ सर्वेक्षण अभियानातील चिपळूण नगर परिषदेच्या यशस्वी कामगिरी बाबत सत्कार



**योगेश सुतार**
**चिपळूण प्रतिनिधी**

- केंद्र शासनाच्या स्वच्छ सर्वेक्षण अभियानात कोकणात प्रथम आलेल्या चिपळूण नगरपालिकेला राज्यात १४ व्या तर देशात ८७ व्या मानांकनाने गौरविण्यात आले. चिपळूण नगरपालिकेच्या या यशाबद्दल लोकमान्य टिळक स्मारक वाचन मंदिरातर्फे आयोजित गौरव सोहळ्यात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचनालयाच्या वतीने प्रातिनिधिक स्वरूपात मुख्याधिकारी यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर घरडा केमिकल्स लोटे कंपनीचे आर सी. कुलकर्णी, प्रशासकीय अधिकारी मंगेश पेढांबकर, आरोग्य विभाग प्रमुख वैभव निवाते, आरोग्य निरीक्षक सुजित जाधव, लोटिस्मा वाचनालयाचे अध्यक्ष डॉ. यतीन जाधव उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला फावडे, घमेलं, खराटा या सफाई औजारांचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यांत आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. यतिन जाधव यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धीरज वाटेकर यांनी तर आभार विनायक ओक यांनी मानले. यावेळी प्रकाश देशपांडे, अरूण इंगवले , बापू साडविलकर, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचनालय अध्यक्ष राष्ट्रपाल सावंत, कार्याध्यक्ष सुनील खेडेकर, कार्यवाह सुमेध करमरकर, रमण डांगे, अमित ओक, प्रदीप पवार, प्राची जोशी आदी संचालक व ग्रंथपाल तेजश्री सोमण उपस्थित होते.

**दैनिक युवक आधार** हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

**daily YUVAK ADHAR** Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# कृषिमंत्री रम्मी खेळण्यात व्यस्त, सिल्लोड तालुक्यातील शेतकरी राजा युरियासाठी त्रस्त

## कृषी अधिकारी यांना स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने निवेदन

**दैनिक युवक आधार**
**सिल्लोड प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**






:- सिल्लोड तालुक्यात युरियाच्या तीव्र तुटवड्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. यामुळे शेती कामांना मोठा फटका बसत असून शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. एकीकडे राज्याचे कृषिमंत्री शेतकऱ्यांच्या गंभीर प्रश्नाकडे लक्ष न देता रमी खेळण्यात व्यस्त असल्याने या गंभीर प्रश्नाकडे शासन दरबारी लक्ष वेधण्यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने सिल्लोड तालुका कृषी अधिकारी यांना निवेदन देण्यात आले.
या निवेदनात त्यांनी सिल्लोड तालुक्यातील शेतकऱ्यांना युरिया खत उपलब्ध होत नसल्याने व व्यापारी युरिया खताची माल साठवणूक करून युरियाचे बिल २६६ रुपयाचे दाखवून ३५० किंवा ४०० रुपयांना खत विक्री करत आहे. युरिया घ्यायचा असेल तर त्यासोबत अन्य दुसऱ्या खतांच्या गोण्या पण सोबत विकत घ्याव्या लागतील तेव्हाच युरिया मिळेल अशा स्वरूपाची शेतकऱ्यांची अडवणूक व्यापारी करत आहे. शेतकऱ्यांमध्ये एकजूट नसल्याने व राजकीय नेते मंडळी व्यापाऱ्यांना पाठीशी घालत असल्याकारणाने व्यापारी एकजूट होऊन शेतकऱ्यांच्या मजबुरीचा फायदा घेताना चे चित्र सिल्लोड तालुक्यातील प्रत्येक खत धारकाकडे दिसत आहे.
सिल्लोड तालुका कृषी अधिकारी यांनी दोन-तीन दिवसात हा प्रकार थांबवावा व शेतकऱ्यांना योग्य दरात मुबलक युरिया उपलब्ध करून देण्यात यावा नसता तीव्र आंदोलन करण्यात येईल व कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला तर याला सर्वस्वी कृषी अधिकारी कार्यालय जबाबदार राहील असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. याप्रसंगी स्वाभिमानीचे नेते युवा जिल्हाध्यक्ष पुरण सनाणसे, तालुकाध्यक्ष सुनिल शिंदे, प्रसाद वराडे, कृष्णा दळवी, मनोज जैस्वाल, सुनील काळे, संतोष वाघमोडे आदी उपस्थित होते.

# शेतकऱ्यांनी सातबारा समजून घेतला पाहिजे - तहसीलदार सुरेश घोळवे

## --गोमळवाडा महसूल मंडळामध्ये छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर शिरूर कासार

**(प्रतिनिधी)**
शेतकऱ्यांनी आपल्या सातबारा बाबत जागरूक राहून सातबारा समजून घेतला पाहिजे. सातबारा हा जमिनीचा आरसा असतो, त्याला आपण जपले पाहिजे; अशा शब्दातून सातबारचे महत्त्व तहसीलदार सुरेश घोळवे यांनी शेतकऱ्यासमोर विशद केले. ते तालुक्यातील पिंपळनेर येथे गोमळवाडा महसुल मंडळाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व शिबीर अभियानात बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तालुक्याचे तहसीलदार तथा दंडाधिकारी श्री. सुरेश घोळवे यांची उपस्थिती होती. त्यांनी आपल्या मार्गदर्शन संवादामध्ये उपस्थित शेतकरी यांना महसूल विषयक बाबी याची माहिती देऊन शेतकऱ्यांना मार्गदर्शनपर संवाद साधला. शासनाच्या महत्त्वकांक्षी प्रकल्पा बाबत माहिती देऊन शेतकरी, युवक ,विद्यार्थी यांना केंद्रस्थानी ठेवून महसूल विभागाची पुढील वाटचालीची दिशा निश्चित केली. शिबिरामध्ये महसूल विभाग मार्फत विविध प्रकारच्या दिले जाणाऱ्या सेवाबाबत माहिती देऊन





लाभार्थी यांना जिवंत सातबारा मोहीम अंतर्गत वारस नोंदी, अपाक नोंदी कमी करणे, कालबाह्य झालेल्या बोजा नोंदी कमी करणे, अग्रीस्टॅक अंतर्गत शेतकऱ्यांचे फार्मर आय डी तयार करणे, सलोखा योजना आदी योजनाची माहिती दिली तसेच शेतकऱ्यांनी शेती विषयक असलेल्या कायद्याचे ज्ञान आत्मसात करण्याचे आवाहन केले. यानंतर लाभार्थ्यांना जिवंत सातबारा मोहिमेअंतर्गत तयार झालेले सातबारा उतारा,महसूली प्रमाणपत्र, ई रेशन कार्ड, संजय गांधी योजनेतील मंजूर लाभार्थी यांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला श्री. विजय इंगळे नायब तहसीलदार, श्री गावडे पुरवठा ना. त., मंडळ अधिकारी श्री. शरद शिंदे, तलाठी श्री. राहुल सानप, चिंतामण सानप,गीताराम वारुंगुळे,श्याम लातूरकर,निखिल मिसाळ. हृषीकेश पाटोकर, तांबुरे,तसेच ग्रामसेवक बद्रीनाथ जगताप, मिसाळ विस्तार अधिकारी येवले, जोजारे.तहसील कार्यालयातील श्री. बडे, मंचारे.तसेच कोतवाल बर्डे, काकडे, नेटके, डोंगर इत्यादी कर्मचारी उपस्थित होते.तसेच महसूल मंडळातील सरपंच मिठू जायभाये,कल्याण काका तांबे,सामाजिक कार्यकर्ते आजीनाथ गवळी,दिलीप जायभाये,अँड.भारत जायभाये,सचिन माने आदी सामाजिक व राजकीय क्षेत्रात काम करणारे मान्यवर उपस्थित होते.तसेच पिंपळनेर येथील व महसूल मंडळ गोमळवाडा मधील शेतकरी,विद्यार्थी,महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री दादासाहेब आंधळे यांनी केले.या कार्यक्रमाचे आयोजन तहसील कार्यालय शिरूर कासार अंतर्गत महसूल मंडळ गोमळवाडा यांच्या वतीने करण्यात आले.

# शेतकऱ्यांचा पीक विम्यावर विश्वास घटला?

## यंदा मोठ्या प्रमाणात उदासीनता

**दैनिक युवक आधार**
**धर्माबाद प्रतिनिधीः गिरमाजी सुर्यकार**
राज्यातील बहुतांश शेतकऱ्यांनी यंदा पीक विम्याकडे पाठ फिरवली आहे. कारण शासनाच्या नव्या अटी आणि शर्ती. मागील वर्षी तब्बल ७६ लाख शेतकऱ्यांनी सहभाग नोंदविलेला असताना, यंदा फक्त २७ टक्के शेतकरीच अर्ज भरले आहेत.

अद्यापही काही दिवस उरले आहेत. प्रचार प्रसिद्धी जोरात चालू आहे. शेतकऱ्यांचा कल शेवटच्या दिवसांतच विमाधारक होण्याकडे असतो. शासनाने केलेले बदल हे विचारपूर्वकच आहेत. आशा आहे की, जास्तीत जास्त शेतकरी पीक विमा योजनेत भाग घेतील.- कृषी अधिकारी , धर्माबाद

पीक विम्यासाठी केवळ ४ दिवस शिल्लक असूनही, ७३ टक्के शेतकरी अद्याप विम्याच्या कवचाबाहेर आहेत. अटी कठीण, भरपाई निश्चित नाही आणि हप्ता स्वतः भरा या बदलांनी शेतकऱ्यांमध्ये मोठी नाराजी पसरली आहे. पावसाच्या लहरीपणावर अवलंबून शेती करणाऱ्या राज्यातील लाखो शेतकऱ्यांसाठी पीक विमा ही एकमेव आर्थिक सुरक्षिततेची हमी असते. मात्र, यंदा प्रधानमंत्री पीक विमा योजनेत अपेक्षित प्रतिसाद नोंदवला गेलेला नाही. योजनेसाठी अवघे ४ दिवस उरले असतानाही केवळ २७ टक्के शेतकऱ्यांनीच सहभाग नोंदवला आहे.

**विम्याच्या अटींमध्ये बदल आणि परिणाम**
शासनाने यंदा पीक विमा योजनेत काही महत्वाचे बदल केले आहेत. शेतकऱ्यांना आता स्वतःचा विमा हप्ता भरावा लागत असून, केवळ 'उंबरठा उत्पादन' गाठल्यासच भरपाई मिळेल.
याशिवाय नैसर्गिक आपत्तीमध्ये आधीप्रमाणे २५ टक्के आगाऊ भरपाईची अट रद्द करण्यात आली आहे. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी विम्याकडे पाठ फिरवली आहे.

**गतवर्षीच्या तुलनेत सहभागात मोठी घसरण**
२०२४ च्या खरीप हंगामात ७६ लाख ३१ हजार ५२७ शेतकऱ्यांनी पीक विमा योजनेत सहभाग घेतला होता. मात्र, यंदा आतापर्यंत केवळ ४५ लाख २८ हजार ३२२ शेतकऱ्यांचे अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यांनी एकूण २८ लाख १९ हजार ३३२ हेक्टर क्षेत्राचे विमा संरक्षण घेतले आहे.

# जगात खूप काही करण्यासारखं असत जो जो करील जयाचे सामर्थ्य आहे

चळवळीचे पर्यावरण प्रेमी व निसर्गमित्र नागेंद्र म्हात्रे सर यांच्या पन्नासाव्या वाढदिवसा निमित्ताने स्वतः केलेला संकल्प म्हणजे कडापे गावतील आदर्श शिक्षक प्रोफेसर प्रशांत म्हात्रे सर यांनी आपण ज्या शाळेत शिकलो जिथे मोठे झालो आणि ज्या शालेने आपल्याला या जगात कसं वावराव याच बाळकडू व संस्कार ज्या शाळेने दिले तिचे ऋणनिर्देशन फेडण्यासाठी पर्यावरण प्रेमी नागेंद्र म्हात्रे सर यांच्या ५० व्या वाढदिवसाचे औचित्य साधत शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना मोफत ओळखपत्र दिले व वाढदिवसाची अनोखी भेट ही नागेंद्र म्हात्रे सर यांना दिली खर तर आपण काय करू शकतो याचा आदर्श प्रोफेसर म्हात्रे सर यांनी सर्वांसमोर ठेवला यापूर्वीच अनेक सामाजिक उपक्रमामध्ये समाविष्ट असणारे प्रशांत म्हात्रे सर यांचे समाजाशी नाते हे धनिष्ठ आहे व ते नेहमीच समाजातील चांगल्या घटकांना प्रोत्साहन देत असतात मात्र सर यांनी अगदी हालाखीच्या परिस्थितीत अगदी कडापे सारख्या दुर्गम भागातुन येत आपलं शिक्षण पूर्ण केलं आणि आज ते नवीन शेवे येथे प्रोफेसर या पदावर कार्यरत आहेत अशा प्रकारे कडापे यामध्ये ओळखपत्र दिल्याबद्दल प्रशांत मात्र सर यांचा सर्व सरांतून अभिनंदन करण्यात येत आहे एक अभिनव उपक्रम म्हणून नागेंद्र सरांना एक अनोखी भेट दिली या कार्यक्रम प्रसंगी रा जि प शाळा कडापेचे मुख्याध्यापक हितेंद्र म्हात्रे सर वाढदिवस मूर्ती नागेंद्र म्हात्रे सर रा जि प शाळा आवरेचे माजी व्यवस्थापन कमिटीचे अध्यक्ष शंकर पाटील हरिष म्हात्रे त्रिजन पाटील व सुयश क्लासेस आवरेचे अध्यक्ष निवास गावंड सर तसेच रा जि प शाळा कडापे शाळेतील विद्यार्थी वर्ग उपस्थित होते



# , मयूर नकवाल.यांची रिसोड शहर भाजपा. सरचिटणीस म्हणून निवड

**दैनिक युवक आधार**
**तालुका प्रतिनिधी रणजीत सिंह ठाकुर**



भाजपा सरचिटणीस रिसोड शहर. मयूर नकवाल यांची. निवड भारतीय जनता पार्टीचे नेते महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणीस, महसूल मंत्री मा. चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेश अध्यक्ष मा. रवींद्रजी चव्हाण, माजी खासदार अनंतरावजी देशमुख व रिसोड मालेगाव विधानसभा निवडणूक प्रमुख मा. नकुलदादा देशमुख, जिल्हा महामंत्री गजानन लाटे साहेब, यांच्या मार्गदर्शक खाली नियुक्ती करण्यात आली,उपस्थित, रिसोड तालुकाध्यक्ष सुभाष भाऊ खरात, गोवर्धन मंडळ अध्यक्ष अमोल भाऊ भुतेकर, रिसोड शहर अध्यक्ष सागर भाऊ डांगे, माजी नगराध्यक्ष यशवंत देशमुख, अमोल लोथे, मयूर नकवाल, दीपक गिराम, मनोज अनसिंगकर, धनंजय मानवतकर, सुनील जुमडे, अमर सानप, गोपाल विखे, निलेश आंबेकर, गणेश भांदुर्गे, सुशील देशमुख, मंगल खिल्लारे, यांच्यासह सर्व पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी सर्वांनी मयूर अनिल नकवाल. यांचे हर्षोल्लासात स्वागत केले. तसेच मयूर नकवाल. हे. वाल्मीक मित्र मंडळाचे. अध्यक्ष.व पोलीस स्टेशन शांतता कमिटी कमिटीचे सदस्य आहे.

# पर्यावरण पूरक कागदी पिशव्या निर्मिती कार्यशाळा संपन्न!

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**
चांगू काना ठाकूर महाविद्यालय खांदा कॉलनी मधिल 8 MAH GIRLS BN, 3 MAH BOYS BN NCC CADETS करीता कागदी पिशव्या निर्मिती या विषयावर एक कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या उपक्रमाचा उद्देश पर्यावरणपूरक पद्धतींना प्रोत्साहन देणे आणि विद्यार्थ्यांना मूलभूत उद्योजकीय कौशल्यांनी सुसज्ज करणे हा होता
.कागदी पिशव्या निर्मिती कार्यशाळेने विद्यार्थ्यांना पर्यावरणीय जाणीव वाढवताना मौल्यवान कौशल्य शिकण्यासाठी
एक आकर्षक व्यासपीठ उपलब्ध करून दिले. दृष्टी फाऊंडेशन संस्थेचे




अध्यक्ष किशोर देवधेकर सर यांनी पर्यावरणपूरक विविध प्रकारच्या कागदी पिशव्या बनवण्याचे प्रात्यक्षिकांसह प्रशिक्षण दिले. कागदी पिशव्या निर्मिती उद्योगा संदर्भात सखोल मार्गदर्शन केले. सदर कार्यशाळा प्राचार्य डॉ . संजय पाटील सर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली. सदर कार्यक्रमाचे आयोजन लेफ्टनंट प्रोफेसर निलिमा तिदार यांच्या संकल्पनेतून करण्यात आले.
कागदी पिशव्या तयार केल्या नंतर खांदा कॉलनी, पनवेल येथील किरकोळ दुकानात जाऊन दुकानदारांना प्लास्टिक पिशव्या न वापरण्या संदर्भात प्रबोधन केले व पर्यावरण पूरक कागदी पिशव्या वापरण्यासंदर्भात सुचना करण्यात आली. मोफत काही कागदी पिशव्या देण्यात आल्या.
सदर कार्यक्रमात एनसीसी सिटिओ प्रोफेसर सागर व्यवहारे, एनसीसी सिटिओ प्रोफेसर जितेंद्र पावरा , दृष्टी फाऊंडेशन संस्थेच्या सचिव सौ.नम्रता देवधेकर आदी प्रमुख उपस्थित होते.

# जलजीवन मिशन अंतर्गत योजनांची प्रलंबित कामे येत्या 15 दिवसात पूर्ण करा

## - महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

## नागपूर जिल्ह्यातील जलजीवन मिशनचा घेतला आढावा

**दैनिक युवक आधार**
**सतीश कडू विदर्भ संपादक आवृत्ती**
: जिल्ह्यातील जलजीवन मिशन अंतर्गत योजनांची प्रलंबित कामे 10 ऑगस्ट 2025 पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश, महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज अधिकाऱ्यांना दिले. जल जीवन अंतर्गत 1302 योजनांची सर्व कामे गुणवत्तापूर्णरित्या करावीत असेही त्यांनी सांगितले.




नियोजन भवन येथे पालकमंत्री श्री. बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली नागपूर जिल्ह्यातील जल जीवन मिशनच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला. त्यावेळी त्यांनी या सूचना केल्या. याप्रसंगी वित्त व नियोजन राज्यमंत्री अड. आशिष जयस्वाल, खासदार श्यामकुमार बर्वे, आमदार विकास ठाकरे आणि संजय मेश्राम, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, अपर जिल्हाधिकारी प्रवीण महिरे आदी उपस्थित होते.

जल जीवन मिशन अंतर्गत जिल्ह्यात सुरु असलेल्या विविध योजनांची माहिती श्री. बावनकुळे यांनी यावेळी जाणून घेतली. या मिशन अंतर्गत येणाऱ्या योजना व यातील अपूर्ण योजनांच्या खर्चाचा नव्याने आराखडा तयार करावा, निधी प्राप्त झाल्यावर पुन्हा खर्चाचा आराखडा तयार करुन निविदा काढाव्यात. एका कंत्राटदाराला दोन पेक्षा जास्त कामे देण्यात येऊ नये आदी सूचना करुन ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या अभियंत्यांनी येत्या 15 दिवसात प्रलंबित सर्व कामे पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी केल्या.

जलजीवन मिशन अंतर्गत जिल्ह्यातील एकुण 13 तालुक्यात समाविष्ट 1302 योजना व यातील योजनांची पूर्ण झालेली कामे, प्रगतीपथावर असलेल्या योजना तसेच ग्रामपंचायतींकडे हंस्तातरित करण्यात आलेल्या योजना, प्रलंबित असलेली नळ जोडणीची कामे आणि केंद्र व राज्य शासनाकडून जलजीवन मिशन अंतर्गत करावयाच्या कामांसाठी आवश्यक निधी आदींबाबत जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता अशोक धोंगे यांनी सादरीकरण केले.

जिल्ह्यातील पाणी टंचाई कृती आराखडयातील आतापर्यंत हाती घेण्यात आलेल्या उपाययोजनांची माहिती श्री. बावनकुळे यांनी यावेळी जाणून घेतली. ज्या गावांमध्ये पाण्यांचे स्त्रोत कोरडे झाले आहेत तिथे बंधारा बांधून पाणी अडवणे, जल पुनर्भरणाची कामे हाती घेणे व अशा गावांमध्ये 15 लाखांच्या मर्यादेतील कामे तातडीने करण्याचे निर्देशही श्री. बावनकुळे यांनी यावेळी दिले. महावितरण कंपनीकडून पाणी पुरवठा योजनांसाठी आवश्यक वीज जोडणीच्या प्रलंबित प्रकरणांचा आढावाही यावेळी घेण्यात आला. महावितरणकडून शहरी आणि ग्रामीण भागात उभारावयाची अतिरिक्त रोहित्रे, वीज वितरणाबाबत करावयाचे व्यवस्थापन आदींविषयी श्री. बावनकुळे यांनी यावेळी यंत्रणांना सूचना केल्या. तसेच गावोगावांमध्ये जाऊन जनतेशी संवाद साधून त्यांच्या समस्या समजून घेण्यासाठी नियोजन करुन त्याची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देशही त्यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांना दिले.

# धावडा स्वतंत्र ग्रामपंचायत तर चिंचवणला नवीन ग्रामपंचायतीचा दर्जा

## गावात आनंदोत्सव,नागरिकांची गैरसोय दूर

**दैनिक युवक आधार प्रतिनिधी**
**:- योगेश पालोदकर**



**सिल्लोड** :- तालुक्यातील धावडा- चिंचवण ग्रुप ग्रामपंचायतीमधुन वेगळी होऊन चिंचवण गावाला स्वतंत्र ग्रामपंचायतीचा दर्जा मिळाला आहे. शासनाने १९ जुलै रोजी परिपत्रक काढून या निर्णयाला अधिकृत मान्यता दिली आहे. यामुळे तालुक्यातील ग्रामपंचायतीची संख्या १०४ वरून १०५ झाली आहे.
धावडा- चिंचवण दोन्ही गावांमधील अंतर साडेपाच किलोमीटर असल्याने चिंचवण गावातील नागरिकांना प्रत्येक कागदपत्राच्या कामासाठी धावडा येथे जावे लागत असे.यामुळे नागरिकांची गैरसोय होत होती. त्यामुळे चिंचवण येथील ग्रामस्थ मागील अनेक महिन्यांपासून स्वतंत्र ग्रामपंचायतीची मागणी शासन दरबारी करत होते.२०११ च्या जनगणनेनुसार चिंचवणची लोकसंख्या १०६६ होती ती आता जवळपास २००० च्या वरती गेली आहे. त्यामुळे पहिल्याच सार्वत्रिक निवडणुकीत गावकऱ्यांना सात ग्रामपंचायत सदस्य आणि एक सरपंच निवडावा लागणार आहे. त्यामुळे गावात आनंदोत्सवाचे वातावरण असून नागरिकांची गैरसोय दूर झाल्यामुळे ग्रामस्थांनी लाडू वाटून समाधान व्यक्त केले आहे.

**शासनाच्या निर्णयाचे स्वागत, विकासाला चालना मिळणार**
दोन्ही गावातील अंतर जास्त असल्याने चिंचवण येथील विकास कामांना व नागरिकांना कागदपत्रासाठी अडथळा निर्माण होत होता तो आता होणार नाही आणि दोन्ही गावातील स्थानिक समस्या आता नागरिकांना त्यांच्याच गावात मांडता येईल व निधीची अंमलबजावणी वेगाने करून विकासासाठी चालना मिळेल आणि विविध योजनांचा लाभ थेट मिळेल.
**- सौ. रीना संदीप इंगळे**
**ग्रा.पं.सदस्य, धावडा- चिंचवण**

# शिर्डी साईबाबांच्या पालखीचे शिवडी वरून प्रस्थान

## साई पालखी पायी दिंडी सोहळ्यात माताभगिनीचा सहभाग

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी**
**राहुल कुलकर्णी**

निफाड तालुक्यातील शिवडी येथील साईभक्त तरुण मित्र मंडळ, समस्त शिवडी ग्रामस्थाच्या आयोजनातून श्रीक्षेत्र शिवडी ते साईबाबांच्या श्रीक्षेत्र शिर्डी येथे पायी दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. २६ रोजी सायंकाळी शिवडी गावातून साईबाबांची पालखी फुलांनी आकर्षक सजवलेल्या वाहनाच्या रथा मधुन भव्य मिरवणूक काढण्यात आली. दि. २७ रोजी सकाळी शिवडी येथून साईबाबांच्या पायी पालखी दिंडी सोहळ्याचे शिर्डी कडे प्रस्थान झाले यावेळी गावातील माहिलांनी रस्त्यावर आकर्षक सडा रांगोळी टाकून सुशोभिकरण केले साई पालखीचे ठिकठिकाणी पुजन करण्यात येवून दर्शन घेण्यात आले. निफाड, नैताळे धारणगाव खडक येथे दुपारच्या भोजनानंतर दिंडी धारणगार वीर रुई, देवगाव, मार्गे वाकद फाटा येथील कालिकामाता लॉन्स येथे पहिल्या मुक्कामाची सोय करण्यात आली असल्याचे आयोजकांनी सांगितले...

या पायी दिंडी सोहळ्यात महिला पुरुष भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणात असुन आकर्षक फुलांच्या माळांनी सजवलेल्या रथा मधून साईबाबांच्या प्रतिमा व पादुका असून डिजेच्या मंगलमय वाद्यांचा गजरात पालखी सोहळा मार्गक्रमण करीत असुन श्रावणातील पहिल्याच सोमवारी सांयकाळ पर्यत साईच्या चरणी लीन होण्यासाठी शेतातील कामाची पेरणीनंतर थोडी उसंत मिळताच साईचरणी लीन होवून.. या पवित्र श्रावण महिण्यातील सोमवारी..... देवा





या महाराष्ट्रात, व देशात भरपुर पाऊस पडू दे शेतकऱ्याना भरपूर अन्न धान्य पिकू दे,... तुझ्या शुभ आशिर्वादाचा सुकाळ या पृथ्वीतलावर होवू दे. सर्वांना उदंड आयुआरोग्य मिळू दे देशात शांतता नांदू दे. शेतकऱ्याच्या शेतीमालाला योग्यभाव मिळू दे... अशी साईच्या चरणी प्रार्थना करणार असुन या दिंडी सोहळ्याचे ८ वे वर्षे असून या दिंडी सोहळ्यात आयोजय अरुण क्षीरसागर, कैलास आव्हाड,आप्पा कातकाडे,समाधान गोसावी कैलास शिरसागर,मंगल कातकाडे, रोशन शिंदे, शंकर गांगुर्डे, प्रशांत क्षीरसागर, नारायण शिंदे, अण्णा सोनवणे, संजय साबळे,नंदू जाधव, रामनाथ शिंदे,नारायण नवले, दिलीप शिंदे,संजय मस्के, भगवान जाधव. आदीसह मोठ्या प्रमाणात महिला माता भगिनी सह पुरुषांच्या सहभागाने शेकडो भाविकांच्या उपस्थितीत श्री साई पालखी सोहळ्याचे शिर्डी च्या दिशेने मार्गक्रमण होत असून या दिंडीत मनोहर सांगळे, सोमनाथ कापसे, सुनील बोरगुडे, दिनकर काकडे, संतोष कातकाडे, दगु नागरे, संजय क्षीरसागर, संपत जाधव, लक्ष्मण गिते, सोपान भुसारे,गोरख सोनवणे, सुभाष क्षीरसागर, दिलीप गोरे, महेश निंबाळकर, संजय शिंदे, अनिल क्षीरसागर, कृष्णा गव्हाणे, निवृत्ती निबाळकर, केदु जेऊघाले, राहुल कुलकर्णी, विनोद गायकवाड, रमेश सानप, भीमा खेलूकर, रणजित क्षीरसागर, टायगर ग्रुप यांच्या कडून दिंडी सोहळ्यात जेवण व चहा पाणी याचे नियोजन करण्यात आले. श्रावण महिन्यातील पावसाच्या सरीन भिजत भक्तीमय वातावरणात एक अनोखी झलक पाहायला मिळत आहे.

## पक्ष संपत नसतो,पक्षाला संपवणारे संपत असतात! — कृष्णा पुसनाके

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी-जितेंद्र खोडे**




यवतमाळः-सोशल मीडिया काँग्रेस कमिटीचे यवतमाळ जिल्हाध्यक्ष कृष्णा पुसनाके यांनी माध्यमांशी संवाद साधताना काँग्रेस पक्षातील सध्याच्या घडामोडींवर स्पष्ट आणि ठाम भूमिका मांडली.त्यांनी जिल्ह्यातील काँग्रेसमधील अंतर्गत वाद,धुसफूस,कार्यकर्त्यांमधील नाराजी,आणि सत्तेचा उपभोग घेतलेल्यांची आजची भूमिकेबाबत रोखठोक भाष्य केलं.कृष्णा पुसनाके म्हणाले, "पक्ष कधीच संपत नसतो,पक्षाला संपवणारेच शेवटी संपून जातात." ही ओळ त्यांनी वारंवार उच्चारत कार्यकर्त्यांना सकारात्मक संदेश दिला.आज जे लोक पक्षाविरोधात नाराजी व्यक्त करत आहेत,तेच कधीकाळी पक्षाच्या जीवावर सत्ता उपभोगून गेले आहेत.त्यांनी पक्षाच्या जडणघडणीत खारीचा वाटा उचलण्याऐवजी,आज पक्षावर बोट ठेवण्याचे काम सुरू केले आहे, ही खंत त्यांनी व्यक्त केली.

यावेळी त्यांनी स्पष्ट केलं की,काँग्रेस पक्ष ही केवळ एक राजकीय संघटना नाही, तर तो विचारांचा प्रवाह आहे.काही व्यक्तींनी पद,संधी,सत्ता मिळवून पक्षाच्या माध्यमातून स्वतःची पोळी भाजून घेतली,आणि आता तेच लोक पाठीमागे वळून पक्षावर टीका करत आहेत, हे दुर्दैव आहे.पुसनाके यांनी कार्यकर्त्यांना आवाहन केलं की,पक्षाच्या तत्वांवर,गांधी-नेहरू-आंबेडकर यांच्या विचारधारेवर विश्वास ठेवा.ही धग अजूनही कार्यकर्त्यांच्या हृदयात पेटलेली आहे.तात्कालिक मतभेद,नाराजी ही स्वाभाविक असली तरी ती संवादातून सोडवता येते,असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## कु. आर्य अमर पापळ यांस महाराष्ट्र राज्य शिष्यवृत्ती परीक्षे मध्ये 84.56 % गुण

### तालुकास्तरावर प्रथम तर जिल्हा गुणवत्ता यादीत चतुर्थ क्रमांक

**दैनिक युवक आधार**
**वावोशी वार्ताहर**



रायगड जिल्हा परिषद शाळा तळाशी केंद्र वावोशी येथील इयत्ता चौथी पर्यंत शिक्षण घेतलेला माजी विद्यार्थी कुमार आर्य अमर पापळ याने महाराष्ट्र राज्य शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये 84.56 टक्के गुण प्राप्त करून तालुकास्तरावर प्रथम तर जिल्हा गुणवत्ता यादीत चतुर्थ क्रमांक प्राप्त करत शाळेचे नाव तालुक्यातच नव्हे तर जिल्ह्यात उज्वल केले . यासोबतच सन 2024 /25 रोजी घेण्यात आलेल्या जवाहर नवोदय प्रवेश परीक्षेत 93.75 टक्के गुण पटकावून जवाहर नवोदय विद्यालय निजामपुर रायगड येथे प्रवेश मिळवला.

2024/ 25 रोजी घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय मंथन परीक्षेत खालापूर सेंटर मध्ये प्रथम क्रमांक प्राप्त केला, तसेच महाराष्ट्र राज्य गणित अध्यापक मंडळामार्फत घेण्यात आलेल्या गणित संबोध परीक्षेत 98 टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक आणि गणित प्रज्ञाशोध परीक्षेत जिल्हास्तरावर रौप्य पदक प्राप्त केले . सन-2024-25 मध्ये घेण्यात आलेल्या ऑल इंडिया सैनिक स्कूल परीक्षेत देखील पास होऊन प्रवेश प्रक्रियेस तो पात्र झाला. एकाच वर्षात या सर्व परीक्षा एकाच वर्षात देऊन सर्व परीक्षांमध्ये घवघवीत यश संपादित केले. यासाठी तळाशी शाळेच्या मुख्याध्यापिका हेमलता पांडुरंग आखाडे आणि सहाय्यक शिक्षिका अर्चना बाळासो घाटे यांनी मार्गदर्शन केले आणि विशेष परिश्रम घेतले .यावेळी योग शिक्षिका पुष्पा साळुंखे यांनी त्याचे अभिनंदन केले.



**दैनिक युवक आधार -** भाजपा पनवेल शहर मंडल उपाध्यक्ष प्रीतम म्हात्रे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना. भाजपा उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, मा नगरसेवक तथा जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, मा नगरसेवक अजय बहिरा, पत्रकार संजय कदम, सोशल मीडिया जिल्हा संयोजक (ओबीसी मोर्चा) तथा शहर संयोजक प्रसाद हनुमंते, जिल्हा चिटणीस(ओबीसी मोर्चा) प्रसाद म्हात्रे, शहर चिटणीस रुपेश नागवेकर, प्रसिद्ध समावलोचक प्रवीण मोहकर, सचिन नाझरे, निशांत पावसकर,परेश बोरकर, सुधीर देसाई, प्रसाद कंधारे, राजू सावंत, सागर मंगवानी उपस्थित होते

## उमरी नगरपरिषद स्वच्छ सर्वेक्षण कालावधी.2024 मध्ये नांदेड जिल्ह्यात सर्वप्रथम

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी**
**चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**

नांदेड - उमरी नगरपरिषद हे नांदेड जिल्ह्यात स्वच्छ सर्वेक्षण 2024 मध्ये महान कामगिरी करत हे यश संपादन केले, व प्रथम क्रमांक पटकावला, तसेच महाराष्ट्र राज्यात 207 वा क्रमांक पटकाविला राष्ट्रीय स्तरावर उंमरी नगरपालिकेने 570 वा क्रमांक मिळविला असून हे यश कर्मचारी काम केल्यामुळे स्वच्छ सर्वेक्षण कामगिरीतून संपादन झाल्यामुळे नगरपालिकेला सन्मानित करण्यात आले असून हे सर्व स्वच्छ सर्वेक्षण कामगिरी करून साध्य करत, उमरी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी नीलम कांबळे मॅडम,यांनी व त्यांच्या टीमने मौल्यवान स्वच्छ सर्वेक्षण कामगिरी करत आहेत

यश संपादन केले यामध्ये, मुख्य अधिकारी नीलम कांबळे, यांनी सर्वप्रथम स्वच्छ सर्वेक्षण स्वच्छ भारत मिशन अभियान, 20 अंतर्गत स्वच्छ भारत अभियान महत्त्वाचा टप्पा राबविला व उमरी शहरातील सार्वजनिक शौचालय नूतनीकरण करून सुविधा अधिक सक्षम व सुलभ करण्यात आले आहे




उमरी शहरातील दिभाजक व्यंकेटश्वर नगर भागातील दुभाजकाना रंगरंगोटी करून सुशोभीकरण करून झाडे लावून सौंदर्यात भर पडली नागरिकांना जनतेला आव्हान करून महत्व पटवून दिले आहे उमरी शहरातील एक पेड मा के नाम या मनी प्रमाणे उमरी शहरातील सर्व गल्लो गल्ली शाळा कॉलेजमधील मुला मुलींना एक पेड माँ नाम के पर मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्यात आले हा महत्त्वाचा संदेश त्यांनी दिला त्यामुळे पर्यावरणात भर पडली पर्यावरणाला गती देऊन पाऊस पडण्यास योग आला, उमरी शहरातील चौका चौकामध्ये सुशोभीकरण करण्यात आले, स्वच्छ सौंदर्य पूर्णपणे करण्यात भर पडली ,तसेच शाळा कॉलेजमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यात आली उमरी शहरातील धार्मिक स्थळावरील सर्व स्वच्छता करण्यात आली उमरी शहरातील सर्व पर्यटन स्थळावरील झाडे लावून सौंदर्यात भर पडली आहे सर्व करण्यामध्ये उमरी नगर परिषदे चे सर्व कर्मचारी त्यामध्ये मुख्याधिकारी नीलम कांबळे मॅडम, कार्यालयीन प्रमुख अधिक अध्यक्ष कांचन पडलवार, मुख्याधिकारी नीलम कांबळे, व स्वच्छ अभियंता विशाल बाराते,लेखापाल बालाजी चावरे,नगर अभियंता कैलास ईमेलवाड, वरिष्ठ लिपिक गणेश मदने, लिपिक सचिन गंगासागरे, अभियंता विनोद सावंत, अभियंता शकील पठाण, स्वच्छता निरीक्षक एस वाय पिंडगुरवार,भीमराव सूर्यवंशी, मुकदम चंद्रकांत, श्री कांबळे, सहप्रकल्प अधिकारी पिराजी गायकवाड,सदानंद गायकवाड, चंद्र प्रकाश मदने,शमिम बेग, मिलिंद सवई, दीपक पोषटवार, शहनाज बेग ,सुनंदा खंदारे,अशोक वाघमारे

तसेच उमरी शहरातील सर्व साफसफाई कर्मचारी घनकचरा व्यवस्थापन कर्मचारी या छोटे-मोठे सर्व कर्मचारी यांच्या सहकार्याने उमरी नगरपरिषद नांदेड जिल्ह्यात नामांकन प्रथम क्रमांक येण्याचा बहुमान पट कविण्यामागे हे यश संपादन करण्यामागे उमरी शहरातील सर्व तरुण तडफदार आजी माजी,

नगरसेवक,व सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते,यांच्यामध्ये सर्वांच्या सहकार्यामुळे हे यश संपादन करू शकले, आहे उमरी शहरातील नागरिकाचा मानाचा सन्मान आहे

## अजिंठा राखीव वनक्षेत्रात 'शतावरी "या औषधी वनस्पतीची तस्करी

### सोशियल मीडियावर व्हिडिओ व्हायरल होताच पर्यावरण संवर्धन डॉ. संतोष पाटील यांची वरिष्ठांकडे तक्रार

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधीः- योगेश पालोदकर**

**सिल्लोड** :- सोशियल मीडिया माध्यम फेसबुक वर अजिंठा येथील एका यु ट्यूबर ने काल अजिंठा राखीव वन क्षेत्रात शतावरी या औषधी वनस्पती व वन उपजाची बेकायदेशीर रित्या लूट सुरु असतांनाचा व्हिडीओ व्हायरल केला.

या व्हिडीओ मध्ये स्थानिक वन तस्कर स्वतःला जंगलचा " पुष्पा " म्हणवून घेतांना दिसत आहे. गोपनिय माहिती नुसार या भागातील विविध संरक्षित वनस्पती एक टेम्पो भरून काल कठोरा बाजार येथील

एक व्यापारी घेवून गेला असून सदर माल निमच - मध्य प्रदेश येथे विकला जातो. लाखो रुपये किमतीचा हा माल काल लंपास करण्यात आला. ही वन तस्करी येथे नेहमीचीचं असते.सदर व्हिडीओ सिल्लोड येथील पर्यावरण संरक्षक डॉ. संतोष पाटील यांनी बघितला असता त्यांनी अजिंठा येथे या विषयी माहिती घेवून याबाबत छ. संभाजी नगर येथील उपवन संरक्षक सुवर्णा माने व वन विभाग,मुंबई यांचे कडे याबाबत तक्रार दिली आहे.

दरम्यान याबाबत चौकशी सुरु करण्यात आली आहे.सदरील वन तस्करी अजिंठा गावाच्या खाली गायमुख भागातील दरीतुन करण्यात आली आहे. प्रादेशिक व सामाजिक वन विभागाचे बहूसंख्य कर्मचारी हे मुख्यालयी राहत नसल्याने तस्करांचे फावते व उचित कार्यवाही होत नाही ही तक्रार पाटील यांनी केली आहे.



## मा.उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त शिधा व फळे वाटप

**दैनिक युवक आधार**
**सणसरः- विकास क्षत्रिय**

इंदापूर तालुका उद्धव ठाकरे शिवसेनेच्या शिवसैनिक यांनी पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या जन्मदिनाच्या निमित्त भवानीनगर ता.इंदापूर येथील भवानीमाता मंदिरात महाआरती करण्यात येऊन येणाऱ्या काळात उद्धव ठाकरे यांच्या माध्यमातून त्यांना महाराष्ट्राच्या सर्व शेतकरी यांची सेवा करण्याची संधी मिळावी. तसेच सणसर ग्रामपंचायत च्या सफाई कामगारांना शिधा वाटप करण्यात आले,सणसर प्राथमिक आरोग्य केंद्रात रुग्णांना फळे आणि बिस्किटे वाटप करुन पक्षप्रमुख उद्धव साहेब ठाकरे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी सणसर लासुर्णे जिल्हा परिषद गटातील जिल्हा प्रमुख संजय काळे,उपतालुकाप्रमुख विजय शिरसट,सणसर सोसायटीचे संचालक पिंटू गुप्ते,जाचकवस्तीचे उपसरपंच अरविंद सुर्यवंशी विभागप्रमुख विजय गायकवाड,रमेश सोनार,अशोक जगताप, शिरिष माने,शरद काळे तानाजी रणदिवे,मंगेश गुप्ते,तानाजी खटके,दादा देशमाने,भाऊ सोनवणे आदी मान्यवर व शिवसैनिक उपस्थित होते



## 'एकनाथ शिंदेंचं प्रेम' फक्त बोलण्यात?

### रेवदंडा बसस्थानक आणि हायस्कूल स्टॉपची भीषण अवस्था ?

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

"रेवदंडा एस.टी. बसस्थानक अपघाताच्या उंबरठ्यावर ! खड्डे, अनाधिकृत पार्किंग, गलिच्छतेचं साम्राज्य; हायस्कूल बसस्टॉपची अवस्था भयावह" ? रेवदंडा हे अलिबाग, मुरूड आणि रोहा या तीन तालुक्यांना जोडणारे मध्यवर्ती ठिकाण असून येथे असलेले एस.टी. बसस्थानक आणि रेवदंडा हायस्कूल बसस्टॉप सध्या अक्षरशः अपघाताच्या उंबरठ्यावर उभे आहेत. स्थानकाच्या आवारात पावसामुळे निर्माण झालेल्या मोठमोठ्या खड्ड्यांत पाणी साचून तळी तयार झाली असून त्या खड्ड्यांमुळे प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. एस.टी. बस स्थानकात वाहनांची वर्दळ मोठ्या प्रमाणावर असून मुंबई, पुणे, ठाणे, शिर्डी, कल्याण, बोरीवली, महाड, धुळे अशा अनेक ठिकाणी जाणाऱ्या बसेस येथे थांबतात.या बसेस ये-जा करताना खड्ड्यांमुळे प्रवाशांना मोठे धक्के बसतात, वाहनचालकांची भंबेरी उडते आणि कोणत्याही क्षणी गंभीर अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.फक्त खड्डेच नव्हे, तर स्थानकाच्या



परिसरात बेशिस्त व अनधिकृत वाहन पार्किंगचे साम्राज्य पसरले आहे. लहान मोठी खासगी वाहने बिनधास्तपणे पार्क केल्याने बसेसच्या हालचालीस अडथळा निर्माण होतो. या गोंधळामुळे प्रवाशांचे जीव धोक्यात आले आहेत, हे वास्तव प्रशासन झाकू शकत नाही.रेवदंडा हायस्कूलजवळचा बसस्टॉप याहून अधिक विदारक अवस्थेत असून, गुटखा खाऊन कोपरे रंगवलेले, गलिच्छ परिसर, अरुंद रस्ता आणि कोणताही ट्रॅफिक नियंत्रण नाही. शाळा भरताना आणि सुटताना विद्यार्थ्यांचा जीव धोक्यात असतो. स्थानिकांनी येथे पोलिस बंदोबस्ताची मागणी केली आहे, जेणेकरून रोडरोमियोंवर वचक बसेल आणि वाहतूक सुरळीत होईल.

"उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे रेवदंडा गावावर विशेष प्रेम आहे" हे अनेकदा बोलले जाते, पण प्रत्यक्षात गावाची स्थिती पाहता हे प्रेम केवळ बोलकी चर्चा वाटते. रेवदंडा एस.टी. स्थानक आणि हायस्कूल बसस्टॉपची दुरवस्था पाहता स्थानिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे."दरवर्षी पावसाळ्यात आम्ही मागणी करतो, पण रस्ते तसेच राहतात. किती जणांचे बळी गेल्यावर प्रशासन जागं होणार?" असा सवाल प्रवासी वर्गाने केला आहे.

स्थानिक प्रशासन, परिवहन खाते आणि राज्य सरकार यांच्याकडून ठोस उपाययोजना होत नसल्याने ही गंभीर स्थिती पुढे महाभयंकर अपघातांना कारणीभूत ठरू शकते, याचा जाब आता थेट मंत्रिमंडळाला विचारला जातोय.

## क्रांतिकारी शिक्षक संघटनेचा उपक्रम 'महाराष्ट्र मॉडेल' होण्याच्या वाटेवर :- शिक्षण मंत्री दादासाहेब भुसे यांचा विश्वास...

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी)**



- क्रांतिकारी शिक्षक संघटनेच्या पश्चिम विभागाचे अध्यक्ष प्राचार्य सतीश वाघमारे यांनी महाराष्ट्र राज्याचे शिक्षण मंत्री मा.ना. दादासाहेब भुसे यांची मालेगाव येथील निवासस्थानी सदिच्छा भेट घेऊन संघटनेच्या विविध उपक्रमांबाबत सकारात्मक संवाद साधला. या भेटीत "क्रांती दिन" निमित्त राबविण्यात येणाऱ्या 'क्रांती सप्ताहा' संदर्भातील माहिती व उपक्रमाचा सादरीकरणात्मक व्हिडिओ त्यांनी मंत्री दादासाहेब भुसे यांना सादर केला. व्हिडिओ बारकाईने पाहिल्यानंतर मंत्री भुसे यांनी या उपक्रमाचे विशेष कौतुक केले. "हा उपक्रम पुणे मॉडेल ठरू शकतो, इतकंच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात प्रभावीपणे राबवता येईल," असे उद्गार त्यांनी या वेळी काढले. त्यांच्या या प्रतिसादामुळे शिक्षक संघटनेच्या कार्याला नवे बळ मिळाले असून, राज्यभरात शिक्षण क्षेत्रात सकारात्मक बदल घडविण्यासाठी हा उपक्रम प्रेरणास्थान ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करून मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# जेष्ठ अभिनेते अमोल पालेकर 'नाफा जीवन गौरव - २०२५ पुरस्काराने सन्मानित!

## "भविष्यात 'नाफा'च्या माध्यमातून हॉलिवूडमध्ये काम करण्याचे स्वप्नं पूर्ण होतील" - जेष्ठ अभिनेते अमोल पालेकर


## मधुर भांडारकर यांच्यासह डॉ. मोहन आगाशे, सचिन खेडेकर, महेश कोठारे, अश्विनी भावे, सोनाली कुलकर्णी, स्वप्नील जोशी, अवधूत गुप्ते, आदिनाथ कोठारे, वैदेही परशुरामी यांचाही 'नाफा फिल्म अवार्ड नाईट'मध्ये विशेष गौरव!

**दैनिक युवक आधार**
**सॅन होजे(प्रतिनिधी)**

'नॉर्थ अमेरिकन फिल्म असोशिएशन'च्या वतीने देण्यात येणाऱ्या 'नाफा जीवन गौरव पुरस्काराने' यंदा जेष्ठ अभिनेते, दिग्दर्शक अमोल पालेकर यांना गौरवण्यात आले. हिंदी, मराठी, बंगाली, कन्नड, मल्याळम भाषांतील चित्रपटांमध्ये आपल्या दर्जेदार आणि परिपक्व अभिनयाने रसिकप्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजविणाऱ्या अमोल पालकरांच्या कार्याचा सन्मान अमेरिकेतील तमाम मराठी प्रेक्षकांच्या उपस्थिती सॅन होजेतील 'द कॅलिफोर्निया थिएटर'मध्ये २५ जुलै रोजी संपन्न झालेल्या 'नाफा ग्लॅमरस फिल्म अवार्ड नाईट' या भव्य आणि दिमाखदार सोहळ्यात करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र राज्याचे सन्माननीय सांस्कृतिक मंत्री अड. आशिष शेलार आणि नाफाचे संस्थापक अभिजीत घोलप यांसह मराठी चित्रपटक्षेत्रातील अनेक दिग्गज कलावंत, प्रेक्षक उपस्थित होते. "भविष्यात 'नाफा'च्या माध्यमातून हॉलिवूडमध्ये काम करण्याचे स्वप्नं पूर्ण होतील" असे गौरवोद्गार अभिनेते अमोल पालेकरांनी हा पुरस्कार स्वीकारताना काढले.

या सोहळ्यात पुढे बोलताना सन्मानीय अमोल पालेकर म्हणाले, "माझा हा सन्मान केलात, गौरव केला याबद्दल नाफाचे, अभिजीत घोलप आणि तुम्हा सर्व रसिकप्रेक्षकांचे मनापासून आभार. काही वर्षांपूर्वी गौरी देशपांडेंच्या कथेवर बेतलेला सिनेमा करण्याची तयारी मी सुरु केली होती. त्या सिनेमामध्ये निकोल किडमन आणि अमिताभ बच्चन या दोघांना घेऊन मराठी सिनेमा बनविण्याचे माझे स्वप्न होते. आम्ही निकोल पर्यंत पोहचलो, त्याला ती पटकथा आवडली आणि त्याने तात्काळ होकारही दिला. मात्र हॉलिवूड मधील कोणत्याही एका स्टुडिओला सोबत घेण्याची अट घातली. या किचकट गोष्टीची कल्पना असल्याने तो विचार मी सोडून दिला. पण त्यावेळेला जर NAFA सारखी संस्था, असे कार्यकर्ते आणि अभिजित सारखी व्यक्ती असती तर तो प्रकल्प पुढे नेता आला असता. पण आता, NAFAच्या माध्यमातून अशी स्वप्नं पूर्ण होतील, अशी मला आशा आहे."



जेष्ठ अभिनेते आणि दिग्दर्शक अमोल पालेकर यांना हा पुरस्कार प्रदान करतेवेळी नाफाचे संस्थापक अध्यक्ष अभिजित घोलप म्हणाले, "यंदाचा नाफा जीवन गौरव पुरस्कार प्रदान करताना विशेष आनंद होत आहे. पालेकरांच्या हळुवार, खुसखुशीत रोमँटिक भूमिकांनी आणि त्यांच्या सहजसुंदर अभिनयाने तमाम भारतीय प्रेक्षकांच्या मनात विशेष स्थान आहे. जुबिलीस्टार अशीही त्यांची ओळख भारतीय चित्रपटसृष्टीत आहे, अश्या महान कलावंताचा हा सन्मान अमेरिकेतील तमाम मराठी रसिकांच्या हृदयातून, आपलेपणाने केला जात आहे. पालेकरांनी हा सन्मान स्वीकारून 'नाफा'चाच सन्मान वाढविला आहे. अमोल पालेकर हे प्रसिद्ध भारतीय अभिनेते, दिग्दर्शक आणि चित्रकार आहेत. त्यांनी मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीत मोलाची भर घातली आहे. ते एक उत्कृष्ट अभिनेते म्हणून ओळखले जातात, तसेच त्यांनी अनेक यशस्वी चित्रपटांचे दिग्दर्शनही केले आहे. त्यांनी ललित कलांमध्ये शिक्षण घेतले आणि 'सर जे.जे. स्कूल ऑफ आर्ट' मधून पदवी मिळवली. त्यांनी सुरुवातीला चित्रकार म्हणून काम केले, पण नंतर अभिनयात पदार्पण केले. पालेकर यांनी अनेक मराठी आणि हिंदी चित्रपटांमध्ये काम केले आहे. 'शांतता! कोर्ट चालू आहे!', 'गोलमाल', 'बातों बातों में', 'छोटी सी बात', 'रजनीगंधा', 'चित्तचोर', 'घरौंदा', 'मेरी बीवीकी शादी', 'नरम-गरम', 'श्रीमान श्रीमती', 'आक्रीत', 'बनगरवाडी', 'ध्यासपर्व', 'कैरी', 'अनाहत', 'धूसर', 'थोडासा रूमानी हो जाय', 'पहेली' यांसारख्या चित्रपटांचा समावेश आहे. त्यांनी अभिनय केलेल्या सर्वच चित्रपटांमधील त्यांच्या भूमिका प्रचंड गाजल्या आहेत.

नाफाच्या फिल्म अवार्ड नाईटची सुरुवात झाली ती 'रेड कार्पेटवरील एन्ट्रीने. सर्वप्रथम स्वप्नील जोशी एका नव्या लूकमध्ये रेड कार्पेटवर अवतरला. त्याला पाहून प्रेक्षकांनी टाळ्या आणि शिट्या वाजवून त्याचे स्वागत केले. त्यानंतर वैदेही परशुरामी, आदिनाथ कोठारे, अमोल पालेकर आणि संध्या गोखले, सोनाली कुलकर्णी तिच्या मुलीसह, अश्विनी भावे, सचिन खेडेकर, गजेंद्र अहिरे, महेश कोठारे, डॉ. मोहन आगाशे आणि मधुर भांडारकर यांच्यासोबत महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक मंत्री अड. आशिष शेलार यांची एंट्री झाली. या सोहळ्यातील मनोरंजनपर कार्यक्रमात मराठी लोकनृत्याचे सादरीकरण पाहायला मिळाले आणि त्यानंतर कलाकारांना सन्मानचिन्हं देण्यात आली. अवधूत गुप्ते यांना प्रेक्षकांनी 'बाई बाई मनमोराचा' आणि 'आयुष्य हे' या गाण्यांची फर्माइश केली.

## इंदापुर येथील प्रियदर्शनी इंग्लिश स्कूलमध्ये 'कारगिल विजय दिवस'साजरा



**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

26 जुलै हा कारगिल विजय दिवस भारतीय सैन्यासाठी शौर्याचा दिवस याच दिवशी कारगिल युद्धात भारताने आपल्या विजयाचा झेंडा फडकवला होता आणि हा दिवस "कारगील विजय दिवस" म्हणून साजरा केला जातो या दिवसाची भावी पिढीला माहिती व्हावी म्हणून प्रियदर्शिनी इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज मध्ये हा दिवस साजरा केला करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून रिटायर्ड आर्मी सूबेदार श्री.महादेव सोमवंशी संस्थेचे व्हा.चेअरमन आदरणीय इम्रान शेख सर,प्राचार्य सुधीर भिसे सर तसेच उपप्राचार्य बोधले सर उपस्थित होते.प्रमुखपाहुण्यांचे स्वागत संस्थेचे व्हा.चेअरमन व प्राचार्य यांच्या हस्ते करण्यात आले

यावेळी विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत,नृत्य,नाटिका सादर करून उपस्थितांची मने जिंकली विशेषत कारगिल युद्धावरील नाटिकेने उपस्थितांमध्ये कृतज्ञेचे व अभिमानाचे भाव निर्माण केले.शाळेचे सहशिक्षिका सौ. प्रीती कुंभार मॅडम यांनी भाषण दिले.तसेच जीशान बागवान व कल्याणी शिंगाडे या विद्यार्थ्यांनीही भाषणे केली या कार्यक्रमा दरम्यान शहीद जवानांच्या बलिदानाला वंदन करत प्रमुख पाहुण्यांनी,सर्व विद्यार्थी सर्व शिक्षकांनी जय जवान,भारत माता की जय,वंदे मातरम घोषणा देण्यात आल्या.तसेच प्रमुख पाहुण्यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली त्यांनी आपल्या भाषणा मध्ये भारतीय लष्कराच्या योगदानाचे महत्त्व अधोरेखित करत शौर्य आणि देश सेवेचे मोल स्पष्ट केले.
कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी प्राचार्य सुधीर भिसे सर यांनी उपस्थितांचे आभार मानले व विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे अभिनंदन केले विद्यार्थ्यांच्या मनात देश प्रेम निर्माण करणे हीच प्रियदर्शिनी इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजची खरी जबाबदारी आहे असे त्यांनी नमूद केले देशभक्तीचा संदेश देणारा हा कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दहावीचे विद्यार्थीनी कु.संयुजा पाटील व कु.सिद्धी सरगर यांनी केले तर आभार प्रदर्शन आठवीची विद्यार्थिनी कु.श्रीविद्या जगताप हिने केले

# नागावच्या राजकारणात खळबळ!

### डॉ. सचिन राउळ यांच्या नेतृत्वाखाली युवाशक्तीचा शिवसेनेत जाहीर प्रवेश आ. महेंद्र दळवी यांच्या उपस्थितीत शक्तीप्रदर्शन

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

नागाव ग्रामराजकारणात मोठी राजकीय उलथापालथ झाली असून सामाजिक कार्य आणि उद्योजकतेत नावारूपाला आलेले डॉ. सचिन राउळ यांनी आज नागावच्या शेकडो युवावर्ग व ग्रामस्थांसह शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. त्यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या पक्षप्रवेशामुळे नागाव परिसरात शिवसेनेची पकड अधिक बळकट होणार, हे स्पष्ट झाले आहे.हा भव्य पक्षप्रवेश सोहळा आज सायंकाळी ५ वाजता आमदार महेंद्र दळवी यांच्या राजमळा निवासस्थानी पार पडला. कार्यक्रमात आमदार दळवी यांनी शाल, श्रीफळ व भगवी शाल देऊन डॉ. राउळ आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे जल्लोषात स्वागत केले.कार्यक्रमाला जिल्ह्यातील अनेक मान्यवर शिवसेना पदाधिकारी उपस्थित होते. यामध्ये माजी जि.प.सदस्या मानसीताई दळवी, जिल्हाप्रमुख राजा केणी, उपजिल्हा प्रमुख शैलेश चव्हाण, जिल्हा खजिनदार सुरेश म्हात्रे, तालुका प्रमुख अनंत गोंधळी, मनोज शिंदे, दिपक रानवडे, महिला संघटिका संजिवनी नाईक, तनुजा मोरे, आणि चौल महिला विभाग प्रमुख ज्योती मुंबईकर आदींचा समावेश होता. यावेळी सचिन राउळ यांच्यासह सदस्य परेश ठाकूर, रोहन नाईक, व्यावसायिक राकेश राणे, आदित्य भगत, मंदार वर्तक, प्रितेश घरत यांनी देखील शिवसेनेत प्रवेश करून दळवी यांच्या गटाला पाठिंबा दर्शवला.या कार्यक्रमात फक्त प्रवेशच नव्हे तर लोकहिताची मागणीही झाली. चौल-आग्राव रस्त्याच्या तातडीच्या दुरुस्तीसाठी डॉ. राउळ यांनी सार्वजनिकरित्या मागणी केली आणि आमदार महेंद्र दळवी यांनी तात्काळ संबंधित अधिकाऱ्यांना रस्तानुतनीकरणाच्या सूचना दिल्या. नागाव आणि चौल परिसरातील तरुणांची शिवसेनेकडे वाढती ओढ आणि राउळ यांचे वाढते वजन लक्षात घेता हा पक्षप्रवेश भविष्यातील राजकारणासाठी महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे, अशी चर्चा सध्या रंगली आहे.





## जिल्ह्याच्या शेवटच्या टोकावर असल्यामुळे लोकप्रतिनिधीचा हलगर्जीपणा,निवडणूकीच्यावेळेस फक्त मतदानाची गरज

### हणेगाव ते मानूर रस्त्यावर खड्डा की,खड्डयात रस्ता

दैनिक युवक आधार
.तालूका प्रतिनिधीः
महादेव उप्पे

देगलूर(दि.२७) देगलूर तालुक्यातील मौजे मानूर हे गाव मौजे हणेगाव येथून किमान पंधरा किलोमिटरच्या अंतरावर असून या गावाला कर्नाटक व तेलंगाना बॉर्डर जवळच असल्यामुळे या भागातील नागरिकांना अशा निकृष्ट दर्जाच्या रस्त्यामुळे व सध्याची परिस्थिती पाहता या रस्त्याला तळ्याचे स्वरूप आल्यामुळे महाराष्ट्रातील नांदेड जिल्ह्यातील रहिवासी असल्याचे खेद वाटत असल्याची चर्चा आहे. आजघडीला मोटारसायकल असो किंवा चारचाकी वाहन असो या रस्त्यावरून चालने म्हणजे जीव धोक्यात टाकून प्रवास करणे असेच आहे.रस्त्यात खड्डा की खड्डयात रस्ता हेच कळत नाही. मानूर या गावापासून तेलंगाना व कर्नाटक राज्याची सिमा दोन ते तीन किलोमीटरच्या अंतरावर असल्यामुळे व या निकृष्ट दर्जाच्या रस्त्यामुळे वैतागुन गेलेले नागरिक फक्त तहसिल कार्यालय,पंचायत समिती,जिल्हा परिषद व विद्यार्थ्यांसाठी शालेय उपयोगी साहित्य तसेच काही गरजू कागदपत्रे,कर्मचारी वर्गाला तालूक्याची गरज भासत असल्यामुळे या रस्त्याने ये जा करीत आहेत, अन्यथा बाकीचे सर्व जीवनावश्यक वस्तू,दवाखाना,शेतीसाठी लागणारे औषधी,दैनंदिन जीवनासाठी लागणारे वस्तू कर्नाटक किंवा तेलंगाना येथून आणत आहेत परंतू याचा परिणाम पुर्णतः हणेगाव बाजारपेठेवर होत आहे. परंतू या रस्त्याकडे या भागातील लोकप्रतिनिधी दुर्लक्ष करीत असून मानूर येथील नाकरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.या भागात लोकसभा,विधानसभा असो कि, जिल्हा परिषद पंचायत समिती असो लोकप्रतिनिधी फक्त निवडणूकीपुरतेच येतात अन कोरडे आश्वासन देऊन जातात परंतू नंतर याचा त्रास आम्हा गावकऱ्यांनाच सहन करावा लागत असल्यामुळे लोकप्रतिनिधींनी याचा लवकरात लवकर विचार करावा अन्यथा याचे परिणाम येणाऱ्या निवडणूकीमध्ये दिसुन येतील अशी चर्चा मानूर येथील नागरिकांमध्ये चालू आहे.



# घाटंजीत राज्यस्तरीय छायाचित्र प्रदर्शन आणि स्पर्धेचे भव्य आयोजन

### फोटोग्राफर्सना मिळणार हक्काचे व्यासपीठ; लाखोंची बक्षिसे जिंकण्याची संधी

**दैनिक युवक आधार -**
**घाटंजी तालुका प्रतिनिधि**
**. महेश पेन्दोर**

**घाटंजी:** छायाचित्रकारांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी आणि त्यांना एक हक्काचे व्यासपीठ मिळावे या उद्देशाने घाटंजी तालुक्यातील "छायाचित्रकार कला-प्रेमी फोटोग्राफर बहुउद्देशीय संस्था ००३६/२४" यांच्या वतीने घाटंजी शहरात प्रथमच दोन दिवसीय राज्यस्तरीय छायाचित्र प्रदर्शन आणि स्पर्धेचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेला महाराष्ट्रातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, अनेक नवोदित आणि अनुभवी छायाचित्रकारांनी आपले उत्कृष्ट नमुने पाठवून सहभाग नोंदवला आहे.

प्रदर्शनाचे उद्घाटन आणि बक्षीस वितरण
या प्रदर्शनाचे उद्घाटन १८ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १० वाजता घाटंजी येथील नगरपरिषद सांस्कृतिक



भवनात मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. यावेळी जिल्ह्यातील उत्कृष्ट छायाचित्रकारांचा गौरव करण्यात येणार आहे. स्पर्धेतील विजेत्यांना १९ ऑगस्ट २०२५ रोजी, जागतिक छायाचित्र दिनानिमित्त, उपस्थित मान्यवरांच्या हस्ते रोख पारितोषिके, प्रमाणपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येईल. हे प्रदर्शन १८ आणि १९ ऑगस्ट रोजी सर्वांसाठी खुले राहणार आहे.
स्पर्धा गट आणि विषय
ही स्पर्धा दोन गटांमध्ये विभागली आहे:
व्यावसायिक गट (PROFESSIONAL CATEGORY):
विषय: 'फेस्टिव्हल' (सण, उत्सव)
बक्षिसे:
प्रथम क्रमांक: ₹२१,०००/- रोख, प्रशस्तिपत्र, सन्मानचिन्ह
द्वितीय क्रमांक: ₹१५,०००/- रोख, प्रशस्तिपत्र, सन्मानचिन्ह
तृतीय क्रमांक: ₹७,०००/- रोख, प्रशस्तिपत्र, सन्मानचिन्ह
खुला गट (OPEN CATEGORY):
या गटामध्ये मोबाइल आणि कॅमेरा दोन्हीमधील छायाचित्रे ग्राह्य धरली जातील.
विषय: निसर्ग सौंदर्य, मानवी जीवन, सांस्कृतिक वारसा आणि इतर छायाचित्रे
**बक्षिसे:**
प्रथम क्रमांक: ₹११,०००/- रोख
द्वितीय क्रमांक: ₹७,०००/- रोख
तृतीय क्रमांक: ₹५,०००/- रोख
याव्यतिरिक्त ६ प्रोत्साहनपर बक्षिसे दिली जातील.
स्पर्धेचा उद्देश
या प्रदर्शनी आणि स्पर्धेमागे, आजच्या धावपळीच्या युगात छायाचित्रकाराला एक उत्तम छायाचित्र काढण्यासाठी किती मेहनत घ्यावी लागते, हे जनतेपर्यंत पोहोचावे हा मुख्य हेतू आहे. प्रत्येक छायाचित्रामध्ये कलाकाराची दृष्टी, संवेदनशीलता, कल्पकता, फ्रेम आणि रंग प्रेक्षकांना प्रत्यक्ष अनुभवायला मिळतील. परीक्षक आणि आयोजक राज्य पातळीवरील अनुभवी, नामांकित आणि अनेक पारितोषिके मिळवलेले छायाचित्रकार या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून काम पाहणार असून, ते अतिशय काटेकोरपणे निवड प्रक्रिया पार पाडतील. घाटंजी फोटोग्राफर्स असोसिएशनचे अध्यक्ष किशोर ठाकरे, उपाध्यक्ष अजिंक्य रुईकर, सचिव सचिन कर्णेवार, नासिर शेख, प्रशांत भोरे, अंकुश कलोडे, संदीप धांदे, रवी भोजवार, मनीष राठोड, आशिष भोयर आणि असोसिएशनच्या सर्व मित्रांनी जास्तीत जास्त प्रेक्षकांनी आणि स्पर्धकांनी या प्रदर्शनी व स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

## कोकण कट्टा व श्री स्वामी समर्थ विश्वकल्यान केंद्र ( आपटे फाटा स्वामी मठ ) आयोजित श्रावण मास शुभारंभनिमित्त शैक्षणिक सोहळा संपन्न

### आदिवासी विभागातील रायगड जिल्हा परिषद शाळा व तेथील आश्रम शाळेतील सुमारे ८५ विद्यार्थीना शालेय साहित्य वाटप

**दैनिक युवक आधार**
**मुंबई (शांताराम गुडेकर)**

कोकण कट्टा सेवाभावी संस्था व स्वामी समर्थ मठा तर्फे स्थानिक आदिवासी विभागातील रायगड जिल्हा परिषद शाळा व तेथील आश्रम शाळेतील सुमारे ८५ विद्यार्थीना प्रत्येकी ६ वह्या, पेन, पेन्सिल, खोड रबर, शार्पनर व खाऊ यांचे भेट देण्यात आली.दुर्गम आदिवासी विभागातील मुलांना शिक्षणाची आवड निर्माण व्हावी व आपण ही समाजाचे देणे लागतो हे लक्षात घेऊन हा उपक्रम गेली अनेक वर्ष सातत्याने विविध विभागात सुरु ठेवले आहे असे मनोगत कोकण कट्टा संस्थेचे संस्थापक अजितदादा पितळे यांनी व्यक्त केले.तर तारा विभागातील समाजसेविका पुष्पलता पाटीलताई यांनी विभागातील अनेक मुले अशा साहित्या पासून वंचित आहेत आपला उपक्रम स्तुत्य आहे. आम्हाला केलेल्या मदतीसाठी आभार व प्रतिवर्षी अशीच





मदत करावी असे नम्र आवाहन केले.स्वामी मठातर्फे उपस्थित शालेय मुलांना प्रसाद म्हणून गोड जेवण देण्यात आले. प्राध्यापिका पुष्पा शर्के, शिक्षक निलेश कोळी मठाचे व्यवस्थापक प्रदीप मोहिते, कोकण कट्टा संस्थापक अजित पितळे, मार्गदर्शक जगन्नाथ गावडे, राजमुद्रा मासिकाचे संपादक पत्रकार अरविंदजी गुरव, सुजित कदम, विवेक वैद्य,राजन राऊत मान्यवर उपस्थित होते. प्राध्यापिका पुष्पा शिर्के यांनी व शाळेतील विद्यार्थीयांनी मोजक्याच शब्दात आभार प्रदर्शन केले. मुलांच्या टाळ्यांच्या गजरात कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# पुढील चार वर्षात देशातील सर्वोत्तम आरोग्य व्यवस्था महाराष्ट्रात निर्माण करू -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## सिकलसेल, थॅलेसिमिया, ॲनिमियावरील उपचारासाठी नवीन योजना तयार करणार

### स्व. भानुताई गडकरी मेमोरियल डायग्नोस्टिक सेंटरचे उद्घाटन

### केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची उपस्थिती

**दैनिक युवक आधार**
***नागपूर, प्रतिनिधी**

प्राथमिक आरोग्य सुविधांच्या दृष्टीने प्रत्येक तीन किलोमीटरमध्ये आरोग्यसेवांचे जाळे निर्माण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. येत्या चार वर्षांत देशातील सर्वोत्तम आरोग्य व्यवस्था महाराष्ट्रात निर्माण करण्यात येणार आहे. यासाठी स्वयंसेवी संस्था तसेच नागरिकांचाही सहभाग तितकाच महत्त्वाचा आहे. येत्या काळात सिकलसेल, थॅलेसिमिया, अनिमियावरील महागड्या उपचारासाठी एक नवीन योजना तयार करणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले.

लष्करीबाग येथील कमाल चौकात स्व. भानुताई गडकरी ग्रामीण विकास संस्थेद्वारा संचालित स्व. भानुताई गडकरी मोमोरियल डायग्नोस्टिक सेंटरचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी अध्यक्षस्थानी तर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि स्व. भानुताई गडकरी ग्रामीण विकास संस्थेच्या अध्यक्ष कांचन ताई गडकरी यांची विशेष उपस्थिती होती. आमदार संदीप जोशी, आमदार प्रवीण दटके, आमदार आशीष देशमुख, बेंगलुरू येथील महाबोधी सोसायटीचे महासचिव पुज्य भंते आनंद थेरा, नागपूर येथील रामकृष्ण मठाचे अध्यक्ष राघवेंद्र स्वामी, माजी मंत्री ॲड. सुलेखा कुंभारे, राजेश लोया, विशाखापट्टणम येथील एएमटीझेडचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. जितेंद्र शर्मा,माजी महापौर दयाशंकर तिवारी, माजी खासदार डॉ. विकास महात्मे, माजी आमदार गिरीश व्यास, माजी आमदार टेकचंद सावरकर आदी मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, आरोग्याच्या क्षेत्रात सेवेसोबतच संवेदनेलाही तेवढेच महत्त्व आहे. नितीनजीकडे सेवा आणि संवेदना या दोन्ही गोष्टी आहेत. त्यामुळेच आईच्या नावाने डायग्नोस्टिक सेंटर सुरू करून गरिबांची सेवा करण्याचा विचार त्यांनी केला आणि तो प्रत्यक्षातही उतरवला. हे केंद्र




आरोग्य सेवेच्या क्षेत्रात मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस पुढे म्हणाले, स्व. भानुताई गडकरी यांच्याकडून नितीनजींना समाजकार्याची प्रेरणा मिळाली. त्यामुळेच ते देशात मोठ्या प्रमाणात काम करू शकत आहेत. समाजातील शेवटच्या व्यक्तीचे कल्याण हा नितीनजींच्या कार्याचा केंद्रबिंदू राहिला आहे. उपेक्षितांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी ते सातत्याने काम करीत आहेत. उद्योग, कृषी, आरोग्य क्षेत्रात त्यांचे विशेष कार्य आहे. याच मालिकेत डायग्नोस्टिक सेंटरचा समावेश होतो. आरोग्यसेवेच्या क्षेत्रात हे खूप मोठे पाऊल असल्याचे ते म्हणाले.

एकीकडे वैद्यकीय क्षेत्रात विकसित तंत्रज्ञानाचा वापर वाढला असताना सेवांचे शुल्क देखील जास्त आहे. अशात एमआरआय आणि सिटी स्कॅनच्या मशीन्स भारतीय बनावटीच्या असतील तर सेवांचे शुल्क देखील कमी राहील. त्याचवेळी भविष्यात महात्मा फुले जन आरोग्य योजनेची अधिक प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी हॉस्पिटल्सची संख्या वाढवावी लागणार आहे. आरोग्य क्षेत्रात काम करीत असताना सेवाभाव आणि संवेदना ह्या गोष्टी आवश्यक असतात. पुढील चार वर्षात देशातील सर्वोत्तम आरोग्य व्यवस्था महाराष्ट्रात निर्माण करण्यात येणार असून सिकलसेल, थॅलेसिमिया, अनिमियावरील उपचारासाठी नवीन योजना तयार करणार असल्याचे ते म्हणाले.

डायग्नोस्टिक सेंटर हे व्यवसायाचे नव्हे तर सेवेचे माध्यम – केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

समाजातील वंचितांची, शेवटच्याच्या माणसाची सेवा करण्याचे, त्यांचे जीवन सुसह्य करण्याचा अंत्योदयाचा विचार पं. दीनदयाल उपाध्याय यांनी दिला. त्या मार्गावर सातत्याने कार्य करीत आहे. राष्ट्रकारण, समाजकारण आणि सेवाकारण, हाच राजकारणाचा खरा अर्थ आहे. त्यामुळे आपल्या कार्यातून गरिबांचे जीवन कसे बदलू शकतो, याचा विचार मी करत असतो. त्याच प्रेरणेतून अनेकांच्या सहकार्याने स्व. भानुताई गडकरी मेमोरियल डायग्नोस्टिक सेंटरची स्थापना होऊ शकली आहे. ज्या आईने जन्म दिला तिच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करू शकलो याचे समाधान आहे, अशी भावना केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केली व्यक्त केली. हे केंद्र व्यवसायाचे नव्हे तर सेवेचे माध्यम आहे, याचाही त्यांनी आवर्जून उल्लेख केला.

**स्व. भानुताई गडकरी मेमोरियल डायग्नोस्टिक सेंटरची वैशिष्ट्ये**

6000 चौरस फूटांचे बांधकाम
वेटिंग एरियासह संपूर्ण वातानुकूलित यंत्रणा
पूर्णपणे पेपरलेस कार्यप्रणाली
उच्च क्षमतेचे सर्व्हर्स
तांत्रिकदृष्ट्या पात्र व प्रशिक्षित कर्मचारी

***एमआरआय (MRI)***
मेड इन इंडिया मशिन्स
1.5 टेस्ला हाय-एंड इमेजिंग, 16 चॅनल
MUSIC तंत्रज्ञानामुळे जलद स्कॅन शक्य, इमेज क्वालिटीमध्ये कोणतीही तडजोड नाही

**सीटी स्कॅन (CT SCAN)**
मेड इन इंडिया मशिन्स
मोठी शरीरयष्टी असलेल्या रुग्णांसाठी मोठे बोअर
कमी वेळात स्कॅन – संपूर्ण छातीचे स्कॅन फक्त 6 सेकंदांत
BIS, AERB, CDSCO मान्यताप्राप्त

***डिजिटल एक्स-रे (DIGITAL X-RAY)***
उच्च दर्जाची डिजिटल एक्स-रे सेवा

**डायलिसिस (DIALYSIS)**
5 उच्च दर्जाच्या डायलिसिस मशिन्स

# कापसाळपर्यंत उड्डाणपुलासाठी संबंधित मंत्र्यांकडे पाठपुरावा होणार!

## महायुती शिष्टमंडळाची आमदार शेखर निकम यांच्यासोबत बैठक

**दैनिक युवक आधार**
**चिपळूण (प्रतिनिधी)**

: मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या चिपळूण शहरातील कामांमध्ये नागरिकांच्या हिताला डावलण्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर, प्रांत कार्यालय ते कापसाळ दरम्यान उड्डाण पूल व्हावा, या मागणीसाठी महायुतीच्या शिष्टमंडळाची आमदार शेखर निकम यांच्यासोबत बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीत पुढील नियोजन निश्चित करण्यात आले असून, लवकरच संबंधित मंत्र्यांकडे पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

शहरामधून सुरु असलेल्या महामार्गाच्या कामामध्ये हायवे प्रशासनाने सुरुवातीपासूनच नागरिकांच्या हिताचा विचार न करता निर्णय घेतल्याचे आरोप यावेळी करण्यात आले. दर्जाहीन काम, अत्यंत संथ गतीने सुरू असलेले काम, नैसर्गिक जलवाहिन्यांचे अडथळे, पिण्याच्या पाण्याच्या पाइपलाईनची गळती, चुकीचे भराव, अर्धवट अप्रोच रोड, तसेच पाग पॉवर हाऊस, पाग मळा व पाग नाका येथील अपघातग्रस्त सर्कल्स – या सर्व मुद्द्यांवर बैठकीत चिंता व्यक्त झाली.

या नियोजनामुळे सुमारे ६ ते ८ हजार रहिवाशांचा जनजीवन विस्कळीत झाले असून, आठ शासकीय कार्यालये, शाळा,




वसतिगृहे, हॉस्पिटल्स, समाजभवन आणि वस्ती भागात राहणाऱ्या अल्पसंख्यांक, मागासवर्गीय जनतेला प्रचंड अडचणींचा सामना करावा लागत आहे. अपघातांचे प्रमाण वाढल्याने नागरिक भयभीत झाले असून, वृद्ध, लहान मुले आणि महिलांना रस्ते ओलांडणेही धोकादायक ठरत आहे.

या पार्श्वभूमीवर, महायुतीतर्फे प्रांत कार्यालय ते कापसाळ दरम्यान उड्डाण पूल व्हावा, ही जोरदार मागणी करण्यात आली आहे. बैठकीत आमदार शेखर सर निकम यांनी, “मी पूर्वीपासूनच उड्डाण पुलासाठी पाठपुरावा करत आहे. आता जनतेचा पाठिंबा ठाम आहे, त्यामुळे या मागणीसाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील,” असे स्पष्ट केले. त्याचबरोबर, नागरिकांना सध्या भोगावे लागणाऱ्या त्रासांबाबत तातडीने उपाययोजना करण्यासाठी तालुका व जिल्हा पातळीवरील प्रशासनाला सूचना देण्यात आल्या आहेत.

तातडीने गतिरोधक, गतीशिथिल फलक, मोठ्या डायवर्जन बोर्ड्स लावणे, पंचायत समितीजवळ आणि पाग पॉवर हाऊससमोर पोलिस बंदोबस्त उभा करणे यांसारख्या सूचनांची अंमलबजावणी लवकरच होणार आहे. तसेच, पालकमंत्री उदय सामंत, खासदार नारायण राणे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे ही मागणी मांडण्यात येणार आहे, व निधीसह मंजुरी मिळवण्यासाठी पाठपुरावा केला जाणार आहे.

या बैठकीस राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष नितीन ठसाळे, शहराध्यक्ष मिलिंद कापडी, शिवसेना शहरप्रमुख उमेश शेठ सकपाळ, भाजप शहराध्यक्ष शशिकांत मोदी, आरपीआय तालुकाध्यक्ष प्रशांत मोहिते, शहराध्यक्ष मंगेश जाधव, युवासेना अध्यक्ष निहार कोवळे, माजी उपनगराध्यक्ष बापूसाहेब काणे, माजी नगरसेवक विजय शेठ चितळे, आशिष खातू, मनोज जाधव, सुयोग चव्हाण, विनोद पिल्ले, अभिजीत सावर्डेकर, उमेश उत्तम सकपाळ, अमोल प्रभाकर कदम, प्रशितोष कदम, मागासवर्गीय सेल अध्यक्ष विशाल जानवलकर, समीर जानवलकर, महायुती समन्वयक उदय ओतारी व इतर मान्यवर उपस्थित होते.

# श्रावण मासानिमित्त श्री सिद्धेश्वराच्या मंदिरांमध्ये भाविकाची अलोट गर्दी

**दैनिक युवक आधार**
**रिसोड प्रतिनिधी. रणजीत सिंह ठाकुर.**

रिसोड येथे पुरातन असे हेंबाडपंती मंदिर आहे रिसोड ऋषी वट ही अनेक ऋषीच्या वास्तव्याने पावन झालेली भूमी आहे या ठिकाणी ऋषीमुनी जब तप अनुष्ठान करीत असत यावरून या भूमीला ऋषीवट असे नाव प्राप्त झाले आहे ही भूमी विसाव्या शतकात श्री संत शिवस्वरूप अमरदास बाबा यांच्या पदस्पर्शाने पवित्र झालेली आहे या ठिकाणी असलेल्या पुरातन हेंबाडपंती श्री सिद्धेश्वर मंदिरात शिव स्वरूप संत अमरदास बाबा हे सिद्धेश्वराची तपस्या करीत असत असे पुरातन सापडलेल्या साहित्यावरून दिसून येते यावेळी सिद्धेश्वराचा परिसर घनदाट जंगल आणि वेळेला होता त्या जंगलात हिस्त्र श्वापदे व मोठे मोठे भुजंग अजगर राहत होते श्री सिद्धेश्वर मंदिर हे यादवकालीन हेंबाडपंथी असून भक्ताची हाक ऐकणारे जागृत देवस्थान समजले जाते त्याची प्रणिती भक्तांनी अनुभवली आहे. हेमाडपंथी मंदिरात कुंड असून त्या कुंडामध्ये सिद्धेश्वराचे शिवलिंग आहे या ठिकाणी सतत नंदादीप तेवत असतो सिद्धेश्वर समोर महादेवाचे वाहन नंदी आसन आसनस्थ आहेत श्रावण मास प्रारंभ झाला की महादेवाचे कुंड पाण्याने भरले जाते मंदिराच्या दक्षिण दिशेला एक दरवाजा आहे त्यास दक्षिण द्वार असे म्हणतात त्या दरवाजातून निघाल्यानंतर समोर त्रिवणी संगम असलेले वृक्ष आहे त्या वृक्षाची महिला मनोभावे पूजा करतात त्रिवेणी संगमा जवळ पुरातन कुंड असून त्या कुंडामध्ये स्नान केल्यास भक्ताच्या मनोकामना पूर्ण होतात असा पुरातन साहित्यातून उल्लेखनीय आहे या मंदिराच्या बाजूला शिवस्वरूप श्री संत अमरदास बाबा यांचे मंदिर आहे या मंदिराचे बांधकाम आकर्षक स्वरूपात केलेले आहे संस्थांच्या विश्वस्त मंडळांनी अनेक सुविधा सोयी सुविधा भाविकासाठी उपलब्ध करून दिलेल्या आहेत



सिद्धेश्वराच्या शिवलिंगाचा जीर्णोद्धार राजस्थान येथील जयपुर चे मूर्तिकार श्री कैलास भारद्वाज यांनी तयार करून श्री सिद्धेश्वर पालखी समिती यांनी सन 2001 मध्ये केला आहे गेल्या 24 वर्षांपासून प्रत्येक सोमवारी रात्री साडेनऊ वाजता श्री सिद्धेश्वर भोलेनाथ यांचीशेजारती होत असते श्री सिद्धेश्वर भोलेनाथ मंदिर अनेक भाविक भक्ताचे श्रद्धास्थान असून श्रावण मासानिमित्त अनेक धार्मिक कार्यक्रम आयोजन केले जाते या धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घेण्याकरता भाविकाची अलोट गर्दी असते महाशिवरात्रीनिमित्त हर बोला हर हर महादेव चा गजरात नगरातून सिद्धेश्वर भोलेनाथ ची पालखी निघत असते त्याचे आयोजन श्री सिद्धेश्वर पालखी समिती करीत असते तसेच श्री संत अमरदास बाबा यांची सुद्धा पालखी वर्षातून दोन वेळा म्हणजे श्रावण मास व महाशिवरात्रीला निघत असते त्यावेळी भव्य महा महाप्रसादाचे कार्यक्रमाचे आयोजन होत असते याचे आयोजन श्री संत अमरदास बाबा व श्री सिद्धेश्वर संस्थानचे विश्वस्त मंडळ करीत असते त्यात रिसोड नगरी व तालुक्याचे असंख्य भाविक भक्त सामील होत असतात

# खासदार संजय देशमुख यांच्यामुळे शेत रस्त्याच्या कामाला झाली सुरुवात.

## समृद्धी महामार्गामुळे नव्हता शेत रस्ता. डॉ सुनील राऊत वनोजा यांच्या पाठपुराव्याला यश.

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम गजानन पवार पाटील.**

**वाशिमः-** समृद्धी महामार्गाच्या निर्मितीनंतर वाशिम जिल्ह्यातील मंगरूळपीर तालुक्यातील वनोजा येथील समृद्धी महामार्ग लगत असलेल्या शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी साधा रस्ता सुद्धा न राहिल्याने गेल्या अनेक वर्षापासून शेतकऱ्यांची शेती पडीत पडल्यासारखी अवस्था झाली होती. साधा शेत रस्ता व्हावा यासाठी गेली कित्येक वर्षापासून शेतकऱ्यांना संघर्ष करावा लागला होता. मात्र शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षांचे निष्ठावंत व कडवे शिवसैनिक (डॉ सुनील राऊत.) यांनी संबंधित शेतकऱ्यासह सातत्याने वाशिम यवतमाळ लोकसभा मतदार संघाचे खासदार संजय देशमुख. यांच्याकडे पाठपुरावा केला होता. खासदार संजय देशमुख यांनी स्वतः वनोजा या गावाला भेट देऊन शेतकऱ्याची हितगुज करून त्यांची ही समस्या जाणून घेतली. ज्यावेळी या समृद्धी महामार्गाची निर्मिती होण्यासाठी शेत जमीन अधिग्रहनाची आवश्यकता होती त्यावेळीही या वनोजा शिवारातील संत्रा मोसंबी सह विविध फळबागाच्या बागायती जमिनी देण्यास शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात विरोध ही केला होता. कारण अत्यंत उत्पादन देणाऱ्या ह्या शेतजमिनी होत्या. त्यावेळी अखेर राज्याचा अत्यंत मोठा रस्त्याच विकास होत असल्याचे बघून त्यांनी आपल्या शेतजमिनी समृद्ध महामार्गासाठी दिल्या. त्यावेळी असलेल्या संबंधित अधिकाऱ्यांनी वनोजा गावामध्ये आल्यानंतर समृद्धी महामार्गामुळे आजूबाजूच्या तुमच्या शेतांना जाण्याकरिता कोणत्याही अडचणी आम्ही उद्भव देणार नाही असे सुद्धा शब्द दिल्याचे लोक सांगतात. मात्र समृद्धी महामार्ग निर्मितीनंतर समृद्धी महामार्ग लगतच्या वनोजा शिवारातील शेतकऱ्यांना आपल्या शेतात जाण्याकरिता साध्या वाटा सुद्धा नाहीत. त्यामुळे मागील काही वर्षात या शेतकऱ्यांची शेती पडल्यासारखी अवस्था निर्माण होत होती. तेव्हा अनेक लोकप्रतिनिधीकडे ग्रामस्थांनी पाठपुरावा केला मात्र त्यांना केवळ आश्वासनावर ताटकळत ठेवले गेले अशावेळी यवतमाळ वाशिम लोकसभा मतदारसंघाचे खासदार संजय देशमुख यांच्याकडे समृद्धी महामार्ग लगतच्या वनोजा व इतर काही गावांच्या शेत शिवारातील शेतकऱ्यांना आपल्या शेतात पीक उत्पादन घेण्याकरिता जाण्या येण्यासाठी शेतवटा उपलब्ध करून देण्याची मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे निष्ठावान तथा कडवे शिवसैनिक डॉ सुनील राऊत. वनोजा यांनी खासदार संजय देशमुख यांच्याकडे पाठपुरावा केला. त्यांना वनोजा येथे आणून शेतकऱ्यांसोबत हितगुज करून आणि प्रत्यक्ष समृद्धी महामार्ग आणि त्यालगत शेतवटा नसलेल्या व त्यामुळे उद्भवणारी अडचण या सर्व बाबीचे जाणीव खासदार संजय देशमुख यांना करवून दिल्यामुळे त्यांनी प्रशासन दरबारी सातत्याने पाठपुरावा केला आणि खासदार संजय देशमुख यांच्या विशेष प्रयत्नामुळे गुरुवारपासून समृद्धी महामार्ग लगतच्या शेतीसाठी शेत वाटा व्हाव्यात यासाठी तात्काळ रस्त्याचे काम सुरू झाले. असून त्या शेतकऱ्यांना योग्य न्याय मिळाला. त्याबद्दल खासदार संजय देशमुख. आणि. तालुकाप्रमुख रामदास सुर्वे पाटील. आणि खासदार संजय देशमुख यांचे खंदे समर्थक. डॉ. सुनील राऊत वनोजा. यांच्या प्रयत्नाला यश आले आहे. दिलेल्या शब्दावर ठाम भूमिका घेत त्या कामांना शासन दरबारातून मंजुरी मिळून लोकांना न्याय देण्याचे काम खासदार संजय देशमुख करीत असल्याचे मत डॉ सुनील राऊत यांनी व्यक्त केले.

